




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक






● वर्ष : ०३ ● अंक : ०६१ ● पुणे ● शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


# श्वान पाळण्यासाठी परवाना गरजेचा

● परवाना नसल्यास दंडाची तरतूद : ऑनलाइन सुविधा असूनही परवाना न घेणारे श्वान-मांजर मालकांमध्ये वाढ सुरूच ●



विशेष वृत्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात श्वान आणि मांजर पाळणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना, सरकारी नियमांप्रमाणे परवाना घेणे अनिवार्य असतानाही बहुतांश नागरिक या प्रक्रियेपासून दूर राहत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने 4 ऑगस्ट 2022 पासून ऑनलाइन परवाना सुविधा उपलब्ध करून दिली. तरीदेखील सध्या शहरातील 5 हजारांहून अधिक श्वान-मांजर मालकांपैकी केवळ 975 जणांनीच परवाना घेतला आहे. महापालिका कार्यालयात जाऊन नोंदणी करणे अनेकांना त्रासदायक वाटत असल्याने ऑनलाइन सोय सुरू करण्यात आली. सुरुवातीला नागरिकांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला आणि 2023 मध्ये 671 नागरिकांनी ऑनलाइन अर्ज करून परवाना घेतला. परवाना मिळाल्यानंतर तो केवळ एका वर्षासाठी वैध असतो आणि दरवर्षी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. परवाना नसलेल्या श्वान किंवा मांजर मालकांना 500 रुपये दंड आकारण्यात येणार आहे. तसेच रेबीज लसीकरण अनिवार्य असून, पाळीव प्राण्यांमुळे शेजाऱ्यांना त्रास होणार नाही, याची जबाबदारी मालकाची असेल. स्वच्छतेसंबंधी तक्रारी किंवा त्रास वाढल्यास महापालिकेला परवाना रद्द करण्याचा अधिकार आहे. नवीन परवान्यासाठी 75 रुपये तर नूतनीकरणासाठी 50 रुपये शुल्क घेतले जाते. ऑनलाइन सुविधा उपलब्ध असल्याने नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे शक्य आहे. महापालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, पाळीव प्राण्यांमुळे इतरांना त्रास होऊ नये आणि नियमांचे पालन व्हावे, म्हणून परवाना घेणे आवश्यक आहे.

### परवाना कसा मिळवायचा?

- ऑनलाइन अर्जामध्ये खालील तपशीलांची नोंद आवश्यक आहे :
- क्षेत्र आणि इमारतीचे नाव
- मालकाचे नाव व ईमेल आयडी
- पाळीव प्राण्याचा रंग, वजन, लिंग
- रेबीज लसीकरणाची माहिती
- पाळीव प्राण्याचा फोटो
- अर्जाची स्थिती आणि शुल्क भरल्याची नोंद

# अध्यक्षपदी पै. तुषार सुभाष पोकळे यांची निवड

## प्रभाग ३४ मध्ये भाजपाचे चारही नगरसेवक निवडून आणण्याचा पोकळे यांचा निर्धार!

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे संघटन बळकट करण्यासाठी पै. तुषार सुभाष पोकळे पाटील यांची प्रभाग अध्यक्षपदी निवड करण्यात आली.त्यांचे निवडपत्र आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या हस्ते देण्यात आले, यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी आमदार भीमराव तापकीर, पुणे शहर भाजप उपाध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, माजी नगरसेवक हरिदास चरवड, माजी नगरसेविका सौ. राजश्री नवले, माजी नगरसेविका सौ. नीता दांगट, ज्येष्ठ नेते हेमंत दादा दांगट, सागर भूमकर, स्वीकृत सदस्य गंगाधर भडावळे



, सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, सारंग नवले, अतुल चाकणकर, सौ. जयश्री पोकळे, आशा बेनकर, कोमल सतीश कुटे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

आमदार तापकीर यांनी तुषार पोकळे यांच्या कामाचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले, आणि प्रभागासाठी ते उत्तम नेतृत्व देऊ शकतील असा विश्वास व्यक्त केला.

निवडीनंतर बोलताना पै. तुषार पोकळे यांनी स्पष्ट सांगितले की, प्रभाग क्रमांक ३४ मधील चारही जागा भाजप जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जाईल.

प्रभागातील विकासकामांना गती देणे, नागरिकांच्या समस्या सोडवणे आणि संघटन अधिक मजबूत करणे हेच त्यांचे पुढील ध्येय असल्याचे ते म्हणाले. तुषार पोकळे यांच्या निवडीमुळे प्रभाग ३४ मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये विशेष आनंदाचा माहोल आहे.






### ठळक बातम्या


## नगरसेवक पदासाठी १ कोटीची बोली

पुणे (आरंभ पर्व) : राज्यात नगर परिषद निवडणुकीसाठीची प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १७ तारखेपर्यंत होती. त्याच दिवशी राजगुरुनगर परिषदेच्या एका प्रभागामधील गावकऱ्यांनी वेगळा निर्णय घेतला. निवडणुकीत अनेक उमेदवार उभे राहणार आणि पैसे खर्च करणार, त्यापेक्षा प्रभागाची निवडणूक बिनविरोध करू, असे त्यांनी ठरवले. मात्र बिनविरोध निवडीसाठी त्यांनी अजब तोडगा काढला. त्यांच्या प्रभागातून सर्वसाधारण व महिला राखीव जागेवरचे दोन्ही उमेदवार लिलावाद्वारे निवडायचे. जे उमेदवार या पदांसाठी जास्त बोली लावतील, त्यांना इतर सर्व उमेदवारांनी पाठिंबा देऊन आपापले उमेदवारी अर्ज मागे घ्यायचे, असे ठरले. 'गाव करील ते राव काय करील', या म्हणीप्रमाणे गावाच्या विरोधात जायची हिंमत कोणताच उमेदवार दाखवू शकला नाही. सर्वांनी प्रस्ताव मान्य केला. या लिलावासाठी गावच्या मंदिरात सर्व उमेदवार आणि गावकरी जमले. सर्वसाधारण जागेसाठी लिलाव बोली सुरू झाली. म्हणता म्हणता ती ९० लाखांवर गेली. त्यावेळी तीनच उमेदवार बोलीच्या रिंगणात राहिले. बोली ९७ लाखांवर गेल्यावर अजून एकाने माघार घेतली. दोनजण उरले. बोलीने एक कोटीचा टप्पा ओलांडला. एकजणाने एक कोटी दोन लाखांची बोली लावली. दुसऱ्याने एक कोटी तीन लाखांचा आकडा उच्चारल्यावर समोरचा थांबला आणि सर्वांत जास्त बोली एक कोटी तीन लाखांवर पक्की झाली.









# बिकट वाट वहिवाट...


बिहारचे ३५वे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांनी काल पदाची शपथ घेतली, तेव्हा त्यांनी भारतात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदी राहिलेल्या आतापर्यंतच्या पहिल्या दहा मुख्यमंत्र्यांत आपलं स्थान नक्की केलं. या यादीत सिक्कीमच्या पवनकुमार चामलिंग, ओडिशाच्या नवीन पटनाईक, पश्चिम बंगालच्या दिवंगत ज्योती बसू, अरुणाचल प्रदेशच्या गेगॉंग अपांग, मिझोरामच्या लाल ठाणवाला, हिमाचल प्रदेशच्या वीरभद्र सिंग आणि त्रिपुराच्या माणिक सरकारनंतर त्यांचा नंबर लागला असला, तरी त्यांची ही कारकीर्द किती मोठी ठरते, यावर ते या यादीत किती पायऱ्या वर चढणार, ते ठरेल. गंमत म्हणजे, ज्या लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली, काही काळ त्यांच्याबरोबर सत्तेतही राहिले, वैचारिक सहप्रवासी म्हणून सरकार बनवताना एकत्र निर्णय घेतले, त्या लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाला पराभूत करूनच नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. १९८९ ची लोकसभा आणि १९९० ची विधानसभा निवडणूक लालूप्रसाद आणि नितीश कुमार यांच्या एकत्रित नेतृत्वाखाली लढवली गेली होती. पण, मुख्यमंत्री झाल्यानंतर लालूंचे रंग बदलू लागले. त्या वादातून १९९४ मध्ये जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली 'समता पार्टी'ची स्थापना झाली. लालूंचा सामाजिक न्यायाचा अजेंडा तेव्हा एवढा जोरात होता, की समता पार्टीला यश मिळणं शक्यच नव्हतं. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज आणि नितीश यांनी त्यामुळे १९९८ मध्ये एकत्र येऊन (मुख्यतः बिहारला डोळ्यासमोर ठेवून) राष्ट्रीय स्तरावर' राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ची स्थापना केली. या आघाडीने नितीशना खरी चाल दिली. चारा घोटाळ्यात लालूंची प्रतिमा धुळीला मिळाली असताना तुरुंगात जाण्यापूर्वी त्यांनी राजकारणात पूर्ण अननुभवी असलेल्या पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने त्यांची होती नव्हती तीही मान्यता संपली. परिणामी सन २००० पर्यंत लालूंचा जनाधार घटत गेला आणि नितीश कुमार यांचा वाढत गेला!

सन २००० मध्येच नितीश कुमार यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पण, ते सरकार प्रत्यक्षात आलंच नाही. त्याची नुकसानभरपाई म्हणून नितीश कुमार यांची वर्णी थेट अटलजींच्या मंत्रिमंडळात, केंद्रात लागली. तिथे त्यांनी आपल्या प्रशासन कुशलतेचा चांगला ठसा उमटवला. देशभर त्यांची प्रतिमा तयार झाली. लालूंवर भ्रष्टाचाराची एकामागोमाग एक प्रकरणं शेकत असताना, त्यातून सावरण्यासाठी त्यांनी घेतलेल्या 'अतिरेकी सामाजिक न्याया'च्या धोरणाने गांवागांवात



वेगळ्या चर्चा सुरू झाल्या. लालू आणि नितीश यांच्यातील त्यावेळच्या तुलनेतच नितीश पुढे निघून गेले. लालू वेगवेगळ्या आरोपात अडकत गेले. लालू आणि नितीश यांचे राजकीय-सामाजिक विचार एक असले, तरी राजकीय मूल्यकल्पना कशा वेगळ्या होत्या, याचा एक किस्सा बिहारमध्ये चांगलाच प्रसिद्ध आहे. २००५ मध्ये विधानसभा निवडणुकीत 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन'ला बहुमत मिळालं. पण, ते स्पष्ट बहुमत नव्हतं. काही आमदार कमी पडत होते. त्यावर तोडगा काढण्यासाठी समता पार्टीचे अध्यक्ष म्हणून जॉर्ज यांच्या निवासस्थानी एक बैठक बसली. बैठकीला नितीश कुमार, शरद यादव, दिग्विजयसिंह असे चार-पाच महत्त्वाचे नेते होते. बरीच आकडेमोड करूनही गणित जुळत नव्हतं. शेवटी आपल्यातल्याच काही आमदारांशी बोलून निधीची व्यवस्था करावी आणि त्यातून सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशी सूचना पुढे आली. ती सूचना ऐकून नितीश कुमार यांनी जागच्या जागी त्या सूचनेला तीव्र विरोध केला. 'अशा प्रकारे मुख्यमंत्रीपद मिळणार असेल, तर ते मला नको' असं त्यांनी त्या बैठकीत बजावलं आणि बैठक मोडली. राजकीय पेच कायम राहिला. त्यामुळे, पुन्हा निवडणूक घ्यावी लागली. ऑक्टोबर २००५ मध्ये झालेल्या त्या निवडणुकीत जनता दलाला (संयुक्त) ८८ जागा मिळाल्या! विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून बिहारी जनतेने नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केलं. नितीश कुमार त्यावेळी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. पुढे त्यांनी आपला सिलसिला चालूच ठेवला. त्याचाच पुढचा अध्याय कालपासून सुरू झाला. गेल्या १९ वर्षांच्या प्रवासात नितीश कुमार यांनी कधी लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाची साथ घेतली, तर कधी भारतीय जनता पक्षाची. त्यावरून त्यांचा 'पलटूराम' असा उपहासही झाला. पण, आपल्या राजकीय अस्तित्वासाठी आणि राजकीय अजेंड्यासाठी केलेल्या अशा तडजोडींतही त्यांची 'सुशासनबाबू' ही प्रतिमा कायम राहिली. ज्या राज्याचा उल्लेख देशात केवळ 'अतिमागास', 'जंगली', 'मध्ययुगीन मानसिकतेचे राज्य' असा केला जात होता, त्याच राज्याला त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. बिहारच्या आमूलाग्र परिवर्तनाला हात घातला. २०२४-२५ची ताजी आकडेवारी पाहिली, तर बिहारची अर्थव्यवस्था ८.६४ टक्के दराने वाढते; खरं तर धावते आहे!

सलग १९ वर्षे मुख्यमंत्रीपदी असलेल्याच्या विरोधात आपोआपच जनमत तयार होतं. सत्तेच्या विरोधातला रोष एकवटतो, असं म्हटलं जातं. नितीश कुमार यांच्याविषयी ते घडलं नाही. उलट, त्यांचा पाठिंबा वाढतच राहिला. याचं कारण, सामाजिक बदलासाठी निर्णय करण्याचा आग्रह आणि स्वतःची मतपेढी तयार करण्याची दूरदृष्टी. समाजातील सर्वात मोठ्या घटकाला, महिलांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी सातत्याने योजना आखल्या आणि त्याची गावपातळीपर्यंत नीट अंमलबजावणी होईल, याची दक्षताही घेतली. लालूप्रसाद यांच्याप्रमाणे न वागता त्यांनी आपल्या कुटुंबाला, नातेवाइकांना राजकीय पटलापासून कटाक्षाने दूर ठेवलं. नाही. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर लगेच मुख्यमंत्रीपद न घेता त्यांनी सामाजिक समीकरण आणि आपली प्रतिमा या दोन्हींचा विचार करून खुबीने जितनराम मांझी यांना मुख्यमंत्री केलं. राजकारणात वेगापेक्षा असा हिशोबी संयमच बहुतेकदा हुकमी यश देत असतो. निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजने' वर चहूबाजूंनी टीका झाली. 'पोल्समॅप' या संस्थेने घेतलेल्या मतदानोत्तर चाचणीत ज्यांना या योजनेचा लाभ झाला, त्यापैकी ६९ टक्के महिलांनी 'अशाप्रकारे निवडणुकीआधी थेट लाभाच्या योजना अयोग्य असल्या'चं मत नोंदवलं. पण, हे पैसे आपल्या खात्यात कशासाठी आले, तेही त्यांना नीट माहीत होतं. त्यांनी त्यानुसार मतदानही केलं! महिलांना दिलेल्या अशा थेट लाभाच्या योजनांनी महाराष्ट्रासह इतर राज्यातही 'जादू' केली, हे जगजाहीर आहे. त्याचा लाभ नितीश कुमार यांना झालाच. पण, त्याआधी गेली काही वर्षं ते 'महिला' हाच आपला जनाधार, असं ठरवून काम करत होते. शाळेत जाणाऱ्या मुलींना मोफत सायकलपासून बचत गटांना दिलेल्या विविध प्रोत्साहन योजना, ग्रामीण जीवनोन्नती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी त्यांना हात देऊन गेली. जात आणि जातीभेदाने ग्रासलेल्या बिहारला, बिहारच्या राजकारणाला नितीश कुमार यांनी यानिमित्ताने अलगद भौतिक कार्यक्रमांवर आणलं, हे त्यांचं यश इतिहासात कायमचं नोंदवलं जाईल.



"लोहगड आणि विसापूरच्या शिखरावरून दिसणारं अद्भुत निसर्गरंग—डोंगर, दऱ्या, धुकं आणि वारा; मन मोहवून टाकणारं दृश्य!" (फोटो : श्री. लक्ष्मण साबळे, पुणे)

## माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्या जयंती निमित्त पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी येथे अभिवादन करण्यात आले पुणे जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्रीरंगनाना चव्हाण पाटील यांच्या हस्ते स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. जनसामान्यांच्या उन्नतीसाठी स्व.इंदिरा गांधी यांनी दुरदृष्टीने कल्याणकारी योजना सुरू केल्या. त्या आजही उपयुक्त आहेत. देशाच्या विकासाला त्यांनी चालना दिली असे चव्हाण पाटील यांनी सांगितले. यावेळी उपस्थित जेष्ठ काँग्रेस नेते गोविंदराव मिरघे,किसान काँग्रेस अध्यक्ष शंकरराव दांगट,पर्यावरण काँग्रेस उपाध्यक्ष धनंजय पाटील, बारामती उपाध्यक्ष सुरेश मते, खडकवासला काँग्रेस उपाध्यक्ष संजय अभंग, खडकवासला काँग्रेस युवक अध्यक्ष विश्वजित जाधव,रघुनाथ यादव, नरसिंग आंदोली, आदी उपस्थित होते.

## पासलकर पती-पत्नी खेड-शिवापूर/खानापूर जिप गटाच्या सर्वांगीण विकासासाठी सज्ज

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढवण्याचा निर्धार

**(दै. आरंभ पर्व)**
खडकवासला आरंभपर्व सामाजिक कार्य, विकासाचा ध्यास आणि सर्वसमावेशक नेतृत्वाचा आदर्शवत प्रवास मांडताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा संघटक व गोऱ्हे बुद्रुक गावाचे माजी सरपंच सचिन गुलाबराव पासलकर आणि त्यांची पत्नी सौ. मुग्धा सचिन पासलकर हे दाम्पत्य आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी सज्ज झाल्याची चर्चा खेड - शिवापूर /खानापूर जिल्हा परिषद गटामध्ये मोठ्या प्रमाणात रंगू लागली आहे. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ सचिन पासलकर हे सातत्याने समाजकारण करत आहेत. युवासेना जिल्हाप्रमुख, खडकवासला विधानसभा समन्वयक आणि सध्या शिवसेना जिल्हा संघटकपदी काम करताना त्यांनी पक्ष संघटनाबरोबरच भागातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर दृढ भूमिका घेतली आहे. २०१५ ते २०२० या काळात गोऱ्हे बुद्रुकचे सरपंच म्हणून त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास





घेतला. त्यांच्या कार्यकाळात—

- ISO दर्जाचे ग्रामपंचायत कार्यालय
- ISO दर्जाच्या अंगणवाड्या
- मॉडेल झेडपी शाळा
- गावाचा स्वतःचा RO फिल्टर प्लांट
- पूर्ण गावाचे १००% काँक्रीटीकरण
- १०० LED पथदिवे आणि CCTV नेटवर्क
- महिला, मुलं, युवक, शेतकरी या सर्वांसाठी विविध योजना
- पॅनकार्ड, रेशनकार्ड, आधारकार्ड कॅम्प
- MSEDCL, PWD, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकांच्या

प्रलंबित प्रश्नांचे निवारण

अशा अनेक उपक्रमांमुळे गोऱ्हे बुद्रुकने आदर्श गावाचा मान पटकावला. या प्रवासात सचिन पासलकर यांना त्यांची पत्नी सौ. मुग्धा पासलकर यांची मजबूत साथ लाभली. सुशिक्षित, खेळाडू आणि सामाजिक जाण असलेली मुग्धाताई वारकरी संप्रदाय, महिला वर्ग तसेच युवा पिढीमध्ये लोकप्रिय आहेत. आता जि.प. गट क्रमांक ४२ खेडशिवापूर येथून निवडणूक लढवण्याची त्यांची तीव्र इच्छा आहे. गोऱ्हे बु मधील सुमारे २६०० मतदारांचा आधार, डोणजे, गोऱ्हे खुर्द, खानापूर, श्रीरामनगर, कल्याण, कोंढणपूर, मांडवी, कुडजे, अहिरे, अगळांबे याठिकाणी असलेला त्यांचा भक्कम जनसंपर्क आणि सर्वपक्षीय मैत्रीचे संबंध यामुळे त्यांच्या दावेदारीला मोठे बळ मिळताना दिसत आहे. वारकरी संप्रदायातील लोकप्रियता, सामाजिक संघटनांमधील सक्रिय सहभाग,दृढ संबंध आणि खेळाडू म्हणून विविध स्पर्धांमधून निर्माण झालेला सचिन पासलकर यांचा जनसंपर्क यामुळे मुग्धाताईंच्या नावाची चर्चा गतीने वाढत आहे. पासलकर पती-पत्नी यांची विकासाभिमुख भूमिका, अजातशत्रू नेतृत्व आणि सर्वांना घेऊन चालण्याची क्षमता पाहता नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मकता वाढली आहे. "भागातील रस्ते, पाणी, वीज, शिक्षण आणि आरोग्य या सर्व विषयांवर मोठ्या प्रमाणावर काम करायचे आहे. खेडशिवापूर गटाचा सर्वकष विकास हेच आमचे ध्येय आहे," असे पासलकर दाम्पत्य सांगतात खेड शिवापूर /खानापूर जिल्हा परिषद गट परिसरातील विकासाचा नवा अध्याय त्यांच्या माध्यमातून उघडेल, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## पत्रकारपदी विशाल भालेराव




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पत्रकारितेच्या क्षेत्रात आठ वर्षांचा भक्कम अनुभव असलेल्या विशाल सुदाम भालेराव यांची दैनिक आरंभपर्वमध्ये पत्रकार/वार्ताहर म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांचा अनुभव, लेखनकौशल्य आणि विविध विभागांमधील उत्तम कामगिरी पाहता संपादकीय विभागाने त्यांना संधी दिली आहे.

मूळचे मालखेड (ता. हवेली, जि. पुणे) येथील विशाल भालेराव यांनी बी.ए. शिक्षणासोबत पत्रकारिता विषयाचा अभ्यासक्रम (डिप्लोमा) पूर्ण केला आहे. त्यांनी आतापर्यंत दैनिक सकाळ, लोकमत, पुढारी, प्रभात, पुण्यनगरी यांसह नामांकित वृत्तपत्रांत काम करताना मैदानी वार्तांकन, राजकीय-सामाजिक घडामोडी, स्थानिक प्रश्न, ताज्या घटना, संपादन तसेच डिजिटल न्यूज हँडलिंग या क्षेत्रांत व्यापक अनुभव मिळवला आहे.

वृत्तसादरीकरणाची वस्तुनिष्ठता, सामाजिक जाण आणि तळमळ ही त्यांच्या कामाची वैशिष्ट्ये ठरली असून, पत्रकारितेकडे बघण्याचा त्यांचा प्रामाणिक आणि अभ्यासू दृष्टिकोन संपादकीय टीमने कौतुकास्पद मानला आहे.

## रसिकाचे क्रिकेट क्षेत्रात बहुमूल्य योगदान



**खेडशिवापूर (दै. आरंभ पर्व) :** खारघर, मुंबई येथे होप मिरर फाऊंडेशन, राष्ट्रवादी काँग्रेस आणि दिव्यांग व्हीलचेअर क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय दिव्यांग महिला क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रेस्ट ऑफ महाराष्ट्र आणि मुंबई दिव्यांग महिला संघांमध्ये झालेले सामने अत्यंत रोमांचक ठरले. अंतिम सामन्यात मुंबई संघ विजेता ठरला. या संपूर्ण स्पर्धेत एक व्यक्ती सतत पाठीशी उभी राहिली — ती म्हणजे पुण्याची रसिका शिंदे. स्वतः 'नॉर्मल' असूनही दिव्यांग महिला क्रिकेटच्या उभारणीत ती सातत्याने काम करत आहे. स्पर्धेदरम्यान तिच्याकडे संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी होती.

## थोडक्यात पण महत्वाचे



### लगड फाऊंडेशनतर्फे संगणक भेट; विद्यार्थ्यांमध्ये उत्साह


**खडकवासला (आरंभ पर्व) : जयप्रकाश नारायण नगर येथील मनपा शाळेमध्ये आज अविनाश लगड युथ फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक संगणक भेट देण्यात आला. फाऊंडेशनचे कार्यकर्ते श्री. किरण भणगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत हा उपक्रम राबवण्यात आला. आधुनिक तंत्रज्ञानाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाला फाऊंडेशनचे प्रमुख श्री. अविनाश लगड, श्री. किरण भणगे, श्री. चेतन भरेकर, श्री. विक्रांत माने, श्री. सचिन रसाळ, श्री. प्रकाश पुणेकर, श्री. शिवदत्त लगड, श्री. शुभम शिंदे, श्री. बाबा कांबळे, श्री. गौतम कांबळे, महेश अहिवले, कुमार दुपारगुडे, विक्रम बागडे, आशुतोष गायकवाड, भीमा धोत्रे, अक्षय गायकवाड तसेच महिला भगिनी सुकेशनी गायकवाड आणि लक्ष्मी बिल्ले उपस्थित होत्या. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संगणकाचे वितरण होताच विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले. शाळेच्या शैक्षणिक उपक्रमांना यामुळे मोठी गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्याध्यापकांनी व्यक्त केला. समाजासाठी सातत्याने उपक्रम राबवणाऱ्या अविनाश लगड युथ फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

### नवनाथ शिवाजी चव्हाण बेपत्ता; वैराग पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार नोंद



**बार्शी (आरंभ पर्व) : जवळगाव नं 2 ता.बार्शी येथील श्री. नवनाथ शिवाजी चव्हाण हे मागील दोन दिवसांपासून बेपत्ता असून त्यांच्या कुटुंबीयांमध्ये मोठी चिंतावस्था निर्माण झाली आहे. नवनाथ चव्हाण हे नागेश चव्हाण यांचे बंधू असून घरातील सदस्यांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र त्यांचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही. घटनेची माहिती मिळताच वैराग पोलीस स्टेशनमध्ये मिसिंग कंप्लेंट नोंदविण्यात आली असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही तपासणी, चौकशी तसेच विविध ठिकाणी शोध घेण्याचे काम वेगाने सुरू असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. कुटुंबीयांनी नागरिकांना विनंती केली आहे की नवनाथ शिवाजी चव्हाण यांच्याबाबत कोणालाही काहीही माहिती मिळाल्यास तात्काळ खालील क्रमांकावर संपर्क साधावा 98 22 36 35 17"भाऊ सुरक्षित परत यावा हीच आमची प्रार्थना आहे. कृपया छोट्यातली छोटी माहितीही कळवा," अशी विनंती नागेश चव्हाण यांनी केली आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.**

### सविता गायकवाड यांच्या नावाची चर्चा जोरात; लॉटरी लागण्याची शक्यता



**पुणे (आरंभ पर्व) : आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीत ओबीसी महिला प्रवर्गातून सविता रमेश गायकवाड या संभाव्य उमेदवार म्हणून जोरदार चर्चेत आल्या आहेत. सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असलेल्या महिलांमध्ये दृढ संपर्क निर्माण केलेल्या सविता गायकवाड यांना प्रभाग क्रमांक ३३ आणि ३५ या दोन्ही ठिकाणांहून संधी मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. सविता गायकवाड या ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश गायकवाड यांच्या पत्नी असून, दोघांचीही सामाजिक क्षेत्रातील सक्रियता परिसरात चांगली ओळख निर्माण करणारी ठरली आहे. महिलांसाठी आणि गरजू नागरिकांसाठी राबवलेले उपक्रम, साधेपणा आणि सर्वांसोबत संवाद साधण्याची सहज शैली यामुळे त्यांचे नाव पुढे येत आहे. या चर्चेबाबत प्रतिक्रिया देताना ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश गायकवाड म्हणाले, "प्रभागाचा विकास करण्यासाठी आम्ही निश्चितपणे प्रयत्न करणार आहोत. नागरिकांच्या अपेक्षा आम्हाला माहिती आहेत. मात्र पक्षाने जो निर्णय दिला, त्याचे आम्ही शतप्रतिशत पालन करू. पक्ष हा आमच्यासाठी सर्वोच्च आहे." राजकीय निरीक्षकांच्या मते, स्थानिक जनसंपर्क असलेले रमेश गायकवाड यांचे चांगले संबंध, सविता गायकवाड यांचे वाढते जनसंपर्क, आणि ओबीसी महिला प्रवर्गातील उमेदवारांची गरज या सर्वांचा मिळून उमेदवारीच्या समीकरणावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.**

## प्रभागाचा विकास हाच माझा ध्यास : अनिलभाऊ कोंढरे



**मिशन महानगरपालिका**
**प्रभाग क्रमांक ३८**

**श्री. लक्ष्मण साबळे**



### प्रभाग ३८ साठी शिवसेनेकडून कोंढरे यांची जोरदार तयारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक 38 मध्ये आगामी महानगरपालिका निवडणुकीची चर्चा रंगत असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतर्फे अनिल भाऊ कोंढरे हे एक प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. आंबेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून काम करताना त्यांनी दाखवलेली कामाची निष्ठा, नागरिकांशी असलेला जवळचा संवाद आणि विकासासाठीची तत्परता यामुळे प्रभागात त्यांची छाप अधिक गडद होत आहे.

उपसरपंच पदावर असताना त्यांनी अनेक विकासकामे केवळ पाठपुरावा करत नाही तर स्वतःच्या स्वखर्चातूनही पूर्ण केली, ही बाब नागरिकांच्या मनात त्यांच्या विषयी जास्त विश्वास निर्माण करणारी ठरली. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणे, आरोग्य सेवा या सर्व क्षेत्रांत त्यांनी प्रभावीपणे काम केले. आंबेगाव परिसरातील अनेक आरोग्य शिबिरे, नागरिकांना दिलेली तातडीची मदत आणि प्रत्येक कुटुंबाशी ठेवलेला संपर्क यामुळे त्यांचे नेतृत्व अधिक मजबूत झाले आहे.

वाहतूक कोंडी ही प्रभागातील मोठी समस्या असून, तिच्या सोडवणुकीसाठीही अनिल भाऊंनी सातत्याने प्रशासनाशी पाठपुरावा केला आहे. धावत्या शहराच्या तुलनेत हा भाग मागे राहू नये म्हणून प्रभागातील अंतर्गत रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण, पावसाळी व ड्रेनेज लाईनची उभारणी या महत्त्वाच्या कामांसाठी ते सतत प्रयत्नशील आहेत. "शहरात जशा सुविधा मिळतात तशाच सुविधा या भागातील नागरिकांनाही मिळाल्या पाहिजेत," असा स्पष्ट मनोदय त्यांनी व्यक्त केला.

दैनिक आरंभपर्व पुणे – मिशन महानगरपालिका या वृत्त संवादामध्ये अनिलभाऊ कोंढरे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी प्रभाग 38 च्या विकासाबद्दल अनेक महत्त्वाची माहिती दिली. रस्ते, पाणी, स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन, आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक सोयी या सर्व मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करून प्रभागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा त्यांचा संकल्प आहे.

सर्व पक्षांतील नेत्यांशी त्यांनी जपलेले सौहार्दपूर्ण संबंध तसेच माजी मंत्री विजय बापू शिवतरे यांचे मार्गदर्शन हे त्यांचे राजकीय बळ मानले जाते. त्यामुळेच स्थानिकांमध्ये त्यांची दावेदारी प्रबळ मानली जाते. प्रस्थापित नेतृत्व असतानाही अनिल भाऊ कोंढरे हे निवडणुकीत उतरल्यास "कडवे आव्हान देऊ शकतील" अशी चर्चा प्रभागभर सुरू आहे. त्यांचे वडील ग्रामपंचायत सदस्य होते. मात्र मुलगा सदस्य झाला उपसरपंच झाला आता नगरसेवक व्हावा अशी ही त्यांची व नागरिकांची इच्छा आहे.

आंबेगाव भागातील अनेक नागरिक त्यांना "हक्काचा भाऊ" मानतात. विकासकामांची निष्ठा, लोकांशी असलेली जवळीक आणि स्वखर्चातून केलेली कामे यामुळे नागरिकांनीही त्यांना नगरसेवक म्हणून पुढे यावे अशी इच्छा व्यक्त केली आहे.

**संवादादरम्यान अनिल भाऊ म्हणाले— "प्रभाग 38 चा खरा विकास करणे ही माझी प्राथमिकता आहे. शहरातल्या सुविधा इथेही आणणे हा माझा ठाम मानस आहे. लोकांचा विश्वास हीच माझी मोठी ताकद आहे." एकूणच पाहता, अनिलभाऊ कोंढरे हे प्रभाग 38 मध्ये एक सक्षम, शांत-संयमी, लोकाभिमुख आणि विकासाभिमुख नेता म्हणून जोरदारपणे उदयास येत आहेत.**






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५












# ‘खेळ रंगला पैठणीचा’ भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न

## खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी केले आयोजन



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ मधील नऱ्हे येथील कैशोरी प्रांगणात दिवाळीच्या निमित्ताने आयोजित केलेला ‘न्यू होम मिनिस्टर – खेळ रंगला पैठणीचा’ हा भव्य कार्यक्रम हजारो महिलांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत दिमाखात पार पडला. संपूर्ण परिसरात महिलांच्या आनंदाचा, हास्याचा आणि उत्साहाचा जल्लोष अनुभवायला मिळाला. हा उपक्रम मा. भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच खडकवासला भाजपा सरचिटणीस श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे (पाटील) आणि श्री संकल्प फाउंडेशनच्या कार्याध्यक्षा सौ. प्रितीताई बापूसाहेब पोकळे (पाटील) यांच्या संकल्पना आणि आयोजनातून पार पडला. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन बापूसाहेब पोकळे मित्र परिवार यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी उपस्थित राहून महिलांना प्रोत्साहन दिले. यामध्ये भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, रुपेश घुले पाटील, माजी नगरसेवक राजेभाऊ लायगुडे, सारंगदादा नवले, सागर भूमकर, तुषार श्रीहरी पोकळे, माजी नगरसेविका नीताताई दांगट, जयश्रीताई भूमकर, कोमल सतीश कुटे, अश्विनी किशोर पोकळे, अतुल चाकणकर, माधुरी चाकणकर , रोहिणी राहणे कोमल सुशांत कुटे , गंगाधर भडावळे,अतुल दांगट, दत्ताभाऊ कोल्हे, किरण हगवणे, सुभाष नाणेकर, जयश्रीताई पोकळे,आदी मान्यवरांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक भव्यता प्राप्त झाली. महिलांसाठी आयोजित विविध मनोरंजक स्पर्धा आणि खेळांमुळे कार्यक्रमात उत्साहाची लाट उसळली. विजेत्या महिलांना इलेक्ट्रिक स्कूटी, फ्रिज, स्मार्ट टीव्ही, होम थिएटर, इलेक्ट्रॉनिक अप्लायन्सेस आणि पैठणी अशी आकर्षक व उपयुक्त बक्षिसे देण्यात आली. अनेक सर्वसामान्य कुटुंबातील महिलांच्या डोळ्यांत बक्षिसे मिळाल्यानंतर आनंदाश्रू दाटून आले. कार्यक्रमादरम्यान हजारो महिलांनी स्वादिष्ट भोजनाचा लाभ घेतला आणि उत्तम व्यवस्थेमुळे भोजन सोहळा सुरळीत पार पडला.

अलीकडील अपघातात मृत्यू पावलेल्या नागरिकांना कार्यक्रमाच्या ठिकाणी काही क्षण शांतता पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संपूर्ण प्रभागात उत्साह, भव्यता आणि महिलांच्या प्रचंड सहभागामुळे हा उपक्रम सध्या चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे.

## 'निर्धार' चित्रपटातील युथफूल गाणे प्रदर्शित...

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तरुणाईवर आधारलेल्या चित्रपटांनी नेहमीच रसिकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. अशाच तरुणाईची गोष्ट 'निर्धार' या आगामी मराठी संगीतप्रधान चित्रपटात पाहायला मिळणार आहे. 'निर्धार' या शीर्षकातच काहीतरी सांगायचे असल्याचे संकेत देणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. मनोरंजनासोबतच प्रबोधन करीत तरुणाईला नवी दिशा देण्याचेही काम करणारा हा चित्रपट येत्या २८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील युथफूल गाणे नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. प्रदर्शित झाल्यापासून हे गाणे सोशल मीडियावर रसिकांचे लक्ष वेधत आहे. निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी जयलक्ष्मी क्रिएशनच्या बॅनरखाली 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे.




## पर्यटन विकासातील दुर्लक्षामुळे स्थानिकांत नाराजी

### विशाल भालेराव

**पानशेत (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला, सिंहगड परिसरातील पर्यटनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या स्थानिकांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून तीव्र असंतोष पाहायला मिळत आहे. अपुऱ्या पर्यटन सुविधा, अर्धवट प्रकल्प, आणि रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे या भागातील आर्थिक चक्र ढवळून निघाले आहे.

भारतामध्ये अनेक राज्ये व शहरे पर्यटन उद्योगामुळे उभी राहिली आहेत. पर्यटन हा रोजगार निर्माण करणारा, स्थानिक उद्योगांना चालना देणारा आणि अर्थव्यवस्थेला बळ देणारा महत्त्वाचा स्तंभ मानला जातो. याच धर्तीवर पुणे जिल्ह्यातील खडकवासला–सिंहगड - पानशेत परिसर हा महाराष्ट्रातील लोकप्रिय पर्यटन पट्टा आहे. मात्र, येथे मागील काही काळात पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची दुरवस्था निर्माण झाली आहे.

पर्यटकांसाठी असणाऱ्या तोडक्या, अपुऱ्या आणि असुविधाजनक सोयींमुळे पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस घटत चालली आहे. याचा थेट परिणाम हॉटेल व्यवसाय, स्थानिक दुकानदार, रिक्षा–वाहतूक व्यावसायिक, भटकंती मार्गदर्शक आणि लहान–मोठ्या उपजीविकेवर अवलंबून असणाऱ्या स्थानिक युवकांवर होत आहे. रोजगाराच्या संधी कमी झाल्याने अनेकांना पुणे आणि मुंबईसारख्या शहरांत स्थलांतर करावे लागत आहे.

दरम्यान, खडकवासला धरण परिसरातील चोपाटीवर आणि पानशेत मेन चौकात अतिक्रमणविषयक कारवाई नुकतीच करण्यात आली. या कारवाईमुळे अनेक स्थानिकांचा रोजगार हिरावला गेला असून “उपासमारीची वेळ आली आहे” अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनी आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, शासन व प्रशासनाने या पर्यटनस्थळाच्या विकासासाठी तात्काळ उपाययोजना करून पर्यटकांना दर्जेदार सुविधा देणे आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराची नवी दारे खुली करणे अत्यावश्यक आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### डॉ. गौरव पोपट घोडे यांचा विशेष गौरव

**पुणे(आरंभ पर्व) :** भारत सरकारच्या डाक विभागातर्फे डॉ. गौरव पोपट घोडे यांचा विशेष गौरव करण्यात आला आहे. माय स्टॅम्प मालिकेअंतर्गत त्यांचे टपाल तिकीट जारी करण्यात आले असून हे तिकीट जागतिक डाक तिकिट प्रदर्शनात देखील प्रदर्शित करण्यात आले आहे. हा सन्मान डॉ. घोडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेणारा आणि प्रतिष्ठेचा मानला जात आहे. आज पुणे जीपीओ (प्रधान डाकघर) येथे आयोजित कार्यक्रमात या विशेष तिकिटाचे औपचारिक वितरण करण्यात आले. पुणे जीपीओचे वरिष्ठ पोस्टल अधिकारी यांच्या हस्ते डॉ. घोडे यांना हे टपाल तिकीट सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित सर्व डाक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. गौरव घोडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. कार्यक्रमाला अनेक मान्यवर व प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते, ज्यामुळे हा सोहळा अधिकच भव्य आणि संस्मरणीय ठरला. भारत सरकारचा हा सन्मान समाजकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारा ठरतो.



### खानापूर–राजगड मार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू

• लक्ष्मण तात्या दारवटकर यांनी शाखा अभियंता ज्ञानेश्वर राठोड साहेबांचे मानले आभार

**सिंहगड (आरंभ पर्व) :** खानापूर–राजगड मार्गावरील हॉटेल तिरंगा ते थोपटेवाडी या दरम्यानच्या रस्त्यावर गेल्या काही महिन्यांपासून मोठमोठे खड्डे पडले होते. या धोकादायक रस्त्यामुळे वाहनधारक, पर्यटक तसेच स्थानिक नागरिक यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. या समस्येच्या निराकरणासाठी सतत पाठपुरावा करत लक्ष्मण तात्या दारवटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे (PWD) वारंवार निवेदन दिले. अखेर त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले असून शाखा अभियंता मा. ज्ञानेश्वर राठोड साहेबांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे खड्डे बुजविण्याचे काम प्रत्यक्ष सुरू झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि रस्त्याच्या सुकर वाहतुकीसाठी महत्त्वाचे असलेले हे काम सुरू केल्याबद्दल लक्ष्मण तात्या दारवटकर यांनी शाखा अभियंता ज्ञानेश्वर राठोड साहेबांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. रस्ता सुधारल्यानंतर खानापूर–राजगड मार्गावरील वाहतूक अधिक सुलभ व सुरक्षित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निकृष्ट गटारकामावर ग्रामस्थांचा संतप्त रोष; आंदोलनाचा इशारा

### विशाल भालेराव



**खेडशिवापूर (दै. आरंभ पर्व)**

पुणे–सातारा महामार्गालगत असलेल्या वेळू (ता. भोर) परिसरातील सर्विस रस्त्यावर करण्यात आलेल्या गटाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

नुकतेच पूर्ण झालेल्या या कामामध्ये अमानक साहित्याचा वापर, कामातील निष्काळजीपणा आणि अनेक ठिकाणी स्पष्टपणे दिसणाऱ्या त्रुटी यामुळे नागरिकांनी संतप्त स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

येत्या पावसाळ्यात या निकृष्ट कामाचा फटका थेट गावकऱ्यांना बसू शकतो, असा इशारा स्थानिकांनी दिला असून अनेक वेळा तक्रारी करूनही जबाबदार अधिकाऱ्यांकडून दुर्लक्षच होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या गंभीर प्रश्नावर गावाचे माजी सरपंच ज्ञानेश्वर पांगारे यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांच्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की — “ग्रामस्थांची फसवणूक करणाऱ्या या निकृष्ट कामाविरुद्ध तात्काळ कारवाई झाली नाही, तसेच गटाराचे नवे, दर्जेदार काम त्वरित हाती घेतले नाही, तर गावकरी एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडतील.”

गावकऱ्यांनी दोषी ठेकेदारावर तात्काळ कारवाई, कामाची चौकशी आणि नवीन मानकांनुसार गटाराचे पूर्णपणे गुणवत्तापूर्ण बांधकाम करण्याची ठाम मागणी केली आहे. समस्या लवकर न सुटल्यास तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व माजी सरपंच ज्ञानेश्वर पांगारे यांनी व्यक्त केला आहे.






# शहराच्या भौतिक सुविधा तरी मिळू द्या : रमेश करंजावणे

## मनसेचे जुने, एकनिष्ठ नेतृत्व रमेश अण्णा करंजावणे; प्रभाग ३३ साठी मनसेकडून इच्छुक




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभपर्व – पुणे मिशन महानगरपालिका या संवाद मालिकेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जुने, संघर्षशील आणि जनतेच्या मनात घर करणारे नेतृत्व रमेश अण्णा बळवंत करंजावणे यांनी प्रभाग क्रमांक 33 मधून मनसेकडून उमेदवारीची इच्छा स्पष्टपणे व्यक्त केली. तब्बल 27 वर्षांचा राजकीय प्रवास असलेल्या रमेश अण्णा यांनी गेली 19 वर्षे मनसे स्थापनेपासून पक्षाशी निष्ठा आणि जनसेवा कायम ठेवली आहे. मनसेचे सोनेरी आमदार म्हणून ओळखले गेलेले स्वर्गीय रमेशभाऊ वांजळे यांचे ते निकटचे सहकारी, त्यांचे मार्गदर्शन व आदर्श सतत अंगीकारणारे रमेश अण्णा हे पक्षातील प्रमुख एकनिष्ठ कार्यकर्ते मानले जातात. त्यांनी पंचायत समिती निवडणूक धायरी गणातून मनसे कडून लढवली आहे.

रमेश अण्णा यांची कार्यशैली म्हणजे समस्यांना मूळातून हात घालणे, जोपर्यंत उपाय मिळत नाही तोपर्यंत प्रशासनाला हलवणे आणि जनतेच्या हितासाठी टोकाची भूमिकाही घेण्याची तयारी. पाणीपुरवठ्याची सुधारणा, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, ड्रेनेज व्यवस्था, घंटागाडी, कचरा व्यवस्थापन, ओढे नाले सफाई, सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छता या सर्व क्षेत्रांमध्ये रमेश अण्णा यांनी प्रत्यक्ष काम करून घेतली आहेत. किरकटवाडी नांदेड फाटा मुख्य रस्त्यावर स्वातंत्र्यानंतर कधीही प्रकाशयोजना नव्हती. अंधारामुळे अपघात, चोरी आणि भीतीची सावली कायम होती. रमेश अण्णा यांनी विद्युत विभागाशी सातत्याने पाठपुरावा करत अखेर त्या मार्गावर नवीन पोल आणि एलईडी लाईट्स लावून घेतले .हा बदल प्रभागातील नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरला.

दूषित पाण्यामुळे पसरलेल्या GBS सारख्या गंभीर आजारावर सर्वांत पहिले आवाज उठवणारेही रमेश अण्णाच होते. नांदेड–किरकटवाडी–धायरी परिसरातील रुग्णसंख्या वाढताना त्यांनी प्रसारमाध्यमे, अधिकारी, महापालिका आणि केंद्रीय पथकापर्यंत हा गंभीर प्रश्न पोहोचवला. विहिरींवर जाळ्या बसवणे, क्लोरीनेशन, साफसफाई, सीसीटीव्ही कॅमेरे, आणि पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी यासाठी रमेश अण्णांनी प्रशासनाला जबाबदार ठरवले. नागरिकांना गंभीर त्रास झाल्याने पाणीबिल माफ करण्याची मागणी त्यांनी आक्रमकपणे मांडली.



नव्याने महापालिकेत समाविष्ट गावांना आजही पुणे शहराच्या स्तरावरील सुविधा मिळत नाहीत, यावर रमेश अण्णा म्हणाले, “फिल्टरेशन प्लांट नाही, पाणीपट्टी मात्र शहराइतकीच... हा सरळ अन्याय आहे. फिल्टरेशन प्लांट बसवा, सहा महिन्यांनी ऑडिट करा आणि पाणीपट्टी कमी करा. गरज पडली तर मी आंदोलनालाही तयार आहे.” संवादात रमेश अण्णांनी जनतेच्या मनाला भिडणारा कळकळीचा प्रश्न उपस्थित केला “आमच्या गावाचं गाव हरवलं... पण शहराच्या भौतिक सुविधा तरी मिळू द्या!समावेश झाला, कर वाढला... पण सुविधा मात्र कुठेच नाहीत. हा जनतेवरील अन्याय थांबला पाहिजे.” किरकटवाडी परिसरात वाढती वाहतूक कोंडी, असमान रस्ते, क्रीडांगणांची गरज, शाळांचे विकासकाम, स्मशानभूमीतील विद्युत दहन सुविधा, स्वच्छता आणि सुरक्षितता या प्रश्नांवरही त्यांनी अनेक वेळा लढा दिला आहे आणि पुढेही नियोजनबद्ध काम करण्याची तयारी दर्शवली आहे.

रमेश अण्णांची स्वतःची शाळा असून त्यांनी शिक्षण क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कामाबद्दल त्यांना अनेक सामाजिक सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. वैयक्तिक स्तरावर ते सिंहगड रोडवरील ओळखले जाणारे शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी बॉडी बिल्डर म्हणूनही परिचित आहेत. रमेश अण्णा म्हणतात, “27 वर्षे राजकारणात आणि 19 वर्षे मनसेमध्ये मी फक्त जनसेवा केली आहे. पक्षाने माझ्या कार्याची कदर करून मला उमेदवारीची संधी द्यावी. माझे ध्येय एकच—सामान्य माणसाचा विकास, त्याच्या हक्काच्या सुविधा आणि प्रभागाचा सर्वांगीण विकास.” प्रभाग क्रमांक 33 मध्ये मनसेकडून विश्वासार्ह, अनुभवी, निष्ठावान आणि जनतेवर प्रेम करणारे नेतृत्व म्हणून रमेश अण्णा करंजावणे हे नाव आग्रहाने घेतले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### गंगाधर भडावळे यांच्या पारिवारिक मेळाव्यात भावनिक वातावरण


- निवडणुकीसाठी परिवाराचा एकदिलाने पाठिंबा

धायरी (आरंभ पर्व) : प्रभाग क्रमांक ३४ –माजी स्वीकृत नगरसेवक आणि प्रभाग ३४ चे भाजपचे इच्छुक उमेदवार गंगाधर भडावळे यांच्या पुढाकाराने आज घेतलेल्या पारिवारिक मेळाव्यात वातावरण अगदी आपुलकीचे आणि भावनिक झाले. कुटुंबातील सर्वजण, नातेवाईक आणि जवळचे सहकारी मोठ्या प्रेमाने एकत्र जमले होते. आगामी निवडणुकीबाबत साध्या शब्दांत चर्चा झाली. कोणती कामे करायची, लोकांपर्यंत कसा पोहोचायचे, प्रभागासाठी काय करता येईल या सर्व गोष्टींबाबत शांतपणे संवाद झाला. मेळाव्यात एक खास क्षण असा होता की संपूर्ण परिवाराने गंगाधर भडावळे यांना एकमुखी पाठिंबा देत उभे राहण्याची तयारी दाखवली. "तुम्ही पुढे चला... आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत," असे म्हणत कुटुंबीयांनी त्यांचा हात मजबुतीने धरला. भडावळे यांनीही भावूक होत सांगितले, "माझा परिवार माझ्या पाठीशी उभा आहे हीच माझ्यासाठी मोठी ताकद आहे. या प्रेमामुळे माझा निर्धार आणखी मजबूत झाला आहे." मेळावा संपताना सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान आणि पुढील वाटचालीबद्दलची आशा दिसत होती. प्रभागात गंगाधर भडावळे यांच्या निवडणूक तयारीला वेग मिळणार असल्याचे या निमित्त दिसून आले. यावेळी खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांनीही या मेळाव्यास भेट देऊन भडावळे परिवारांचा सन्मान स्वीकारला. व सर्वांशी चर्चा केली.



### शेतकऱ्यांसाठी माजी नगरसेवक दिलीप अण्णा वेडे पाटील यांची मदत

पुणे (आरंभ पर्व) : राज्यातील अनेक भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा मिळावा या उद्देशाने पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक दिलीप अण्णा वेडे पाटील यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रु. 2.51 लाखांचा धनादेश थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या या छोटेखानी कार्यक्रमात ही मदत स्वीकारताना देवेंद्र फडणवीस यांनी दिलीप अण्णा वेडे पाटील यांच्या या समाजहिताच्या उपक्रमाचे विशेष कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा हा संवेदनशील आणि प्रशंसनीय उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.







# 'प्रगती पर्व' कार्य अहवालाचे भव्य प्रकाशन

## हरिदास चरवड यांच्या ९ वर्षांच्या लोकसेवेचा शब्दमय प्रवास

- आ. भीमराव तापकीर, शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रकाशन



**क्रीडा साहित्य वितरण, आरोग्य शिबिरे, मंदिर परिसरांचे सुशोभीकरण, वृक्षारोपण, बूथ संघटना मजबूत करणे आणि नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्याची त्यांची कार्यशैली यामुळे परिसरात त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. कार्यक्रमाच्या शेवटी बोलताना हरिदास चरवड म्हणाले की, "नागरिकांचा विश्वास हीच माझी सर्वात मोठी ताकद आहे. माझे सर्व काम लोकांच्या भल्यासाठीच असते. माझ्या प्रवासात साथ देणाऱ्या प्रत्येकाचे मी मनःपूर्वक आभार मानतो." ही प्रकाशन सोहळा लोकसेवा, विकास आणि जनविश्वासाच्या प्रवासाला उजाळा देणारा ठरला.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नगरसेवक म्हणून 2017 ते 2022 या काळात आणि त्यानंतरही मागील चार वर्षांत समाजासाठी सातत्याने काम करत आलेल्या हरिदास चरवड यांच्या सर्व प्रगतीकामांचा आणि उपक्रमांचा आढावा घेणारा 'प्रगती पर्व' हा कार्य अहवाल मोठ्या उत्साहात प्रकाशित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे शहर भाजपाध्यक्ष धीरज घाटे यांनी भूषविले, तर अहवालाचे प्रकाशन आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी राजेंद्र महाराज येपेरे, प्राचार्य सुधाकरराव जाधवर, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सचिन निवांगुणे, तसेच परिसरातील नागरिक, माता-भगिनी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'प्रगती पर्व' या अहवालातून हरिदास चरवड यांनी गेल्या नऊ वर्षांत केलेल्या विविध कामांचा परिपूर्ण आढावा देण्यात आला आहे. यात शिक्षण क्षेत्रातील तीन नवीन शाळांची उभारणी, विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची निर्मिती, आरोग्य विभागात तीन दवाखान्यांचे काम, आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरे आणि सातत्याने घेतलेले रक्तदान उपक्रम यांचा समावेश आहे. परिसरातील दोन उद्यानांचे सुशोभीकरण, समाजमंदिरांचे नूतनीकरण, तीन क्रीडांगणे, स्वच्छता मोहिमा आणि वृक्षारोपण या उपक्रमांमुळे परिसरात सकारात्मक बदल दिसून येत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. वाहतूक सुधारण्यासाठी बस स्टॉपचे नूतनीकरण, नवीन बसस्टॉप उभारणी, जोडरस्त्यांची सुधारणा आणि मेट्रो प्रकल्पांसाठी केलेला समन्वयही उल्लेखनीय ठरला आहे. आर्थिक प्रगतीसाठी एक्स्पोर्ट कॉम्प्लेक्सची संकल्पना मांडून त्याचे प्राथमिक काम सुरू करण्यात आले असून, १५–१६ महत्त्वाचे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करताना हरिदास चरवड यांचे काम सर्वांगीण आणि लोकाभिमुख असून, ते निवडणूक असो वा नसो सातत्याने लोकांसाठी उभे राहतात, असे गौरवोद्गार काढले. आमदार तापकीर यांनी 'प्रगती पर्व' हा त्यांच्या जबाबदार कामाचा पुरावा असल्याचे सांगितले. प्राचार्य जाधवर यांनी २५ वर्षांपासून चरवड यांची लोकसेवा सातत्याने सुरू असल्याचे सांगून त्यांचे कौतुक केले. राजेंद्र महाराज येपेरे यांनी त्यांच्या कार्यात समाजकार्य, संस्कार आणि अध्यात्माचा सुंदर मेळ असल्याचे नमूद केले. व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सचिन निवांगुणे यांनी व्यापारी वर्गाच्या प्रत्येक प्रश्नावर ठामपणे उभे राहणारे नेतृत्व म्हणजे हरिदास चरवड असल्याचे सांगून त्यांची भावनिक दखल घेतली.

## खडकवासला धरण परिसरात बुद्ध विहार पाडल्याचा आरोप

**विशाल भालेराव**

- पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यावर जातीय मानसिकतेतून कारवाई केल्याची तक्रार

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरण परिसरात बौद्ध बांधवांच्या धार्मिक स्थळावर करण्यात आलेल्या कारवाईने मोठा वाद निर्माण झाला आहे. पाटबंधारे विभागाच्या अधिकारी श्रीमती गिरीजा प्रशांत फुटाणे (कल्याणकर) यांनी जातीय मानसिकतेतून निवडकपणे कारवाई केल्याचा गंभीर आरोप अर्जदार कुणाल सुनील सरवदे यांनी नांदेडसिटी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीत केला आहे. अर्जात म्हटले आहे की, खडकवासला धरणाच्या पुरक्षेत्राबाहेर असलेल्या भूमीवर 1956 साली भैयासाहेब आंबेडकर यांनी पश्चिम हवेलीतील ५६ गावांतील बौद्ध बांधवांना बुद्ध दीक्षा दिली होती. या ऐतिहासिक स्थळी स्थानिक समाजाने बुद्ध विहार उभारून दर रविवारी बुद्ध वंदना करण्याची परंपरा ठेवली होती. याच जागेवरील जमीन दीक्षाभूमी म्हणून संस्थेला मिळावी यासाठी "दीक्षाभूमी चारटीबल संस्था" मार्फत शासनाकडे 9 फेब्रुवारी 2024 रोजी अर्ज दाखल झाला असून त्यावर सरकारी प्रक्रिया सुरू आहे. अर्जदाराच्या मते, दोन चोपाट्यांवरील ८०% दुकानदार चांभार समाजातील असून पाटबंधारे विभागाकडून सर्वांना हटवण्यात आले. त्याच कारवाईदरम्यान बुद्ध विहार पाडण्यात आला, विहारातील बुद्ध मूर्ती, बाबासाहेबांचे पुतळे, सावित्रीबाई व महात्मा फुले यांचे फोटो यांचेही नुकसान झाले. दर्ग्याशेजारी असलेला शेडही हटवण्यात आला.

मात्र, त्याच ठिकाणी बांधलेले नवीन महादेव मंदिर मात्र पाडण्यात आले नाही, किंवा त्यास हातही लावण्यात आला नसल्याने ही कारवाई जातीय मानसिकतेतून करण्यात आल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे.


श्रीमती फुटाणे यांच्या मागील दोन महिन्यांतील कॉल रेकॉर्डची तपासणी करण्यात यावी, तसेच या प्रकरणात संबंधित मंत्री व वरिष्ठ अधिकारी सहभागी असतील तर त्यांच्यावरही अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे. या घटनेमुळे स्थानिक बौद्ध बांधवांमध्ये तीव्र नाराजी असून, योग्य कारवाई न झाल्यास आंबेडकरी समाज एकत्र येऊन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## खानापूर गणात शरद 'लाला' जावळकर तर खानापूर - खेड शिवापूर गटात शिवानी यादव यांची लोकप्रियता ठाम

### खेडशिवापूर-खानापूर गटात- गणात शिवानी यादव उदयास

- इतर पक्षीय नेत्यांची अजूनही जुळवा-जुळवी
- राजकीय समीकरणे ढवळून निघण्याची शक्यता





**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खेडशिवापूर-खानापूर गटात गणात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकारणात हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर दोन नावांना विशेष लक्ष मिळताना पाहायला मिळत आहे. खानापूर गणात शरद (लाला) जावळकर यांनी आपली ताकद पुन्हा सिद्ध केली असून, दुसरीकडे खेडशिवापूर-खानापूर गटात खेड शिवापूर गटात, गणात शिवानी यादव या प्रभावी पर्याय म्हणून जोरदारपणे पुढे येत आहेत.

खानापूर गणात शरद (लाला) जावळकर गेली काही वर्षे सातत्याने विकासकामे, जनसंपर्क आणि स्थानिक प्रश्नांवरील सक्रिय भूमिकेमुळे ओळखले जात आहेत.

गावस्तरावरील पाणीपुरवठा, रस्त्यांचे काम, सामाजिक उपक्रम, युवकांसाठी क्रीडा साहित्य, तसेच धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग यामुळे जावळकर यांच्या नेतृत्वाला स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद मिळत आहे.

जावळकर यांच्यावरील जनतेचा विश्वासवत वाढत असून, अनेक गावांतून त्यांना मिळणारा प्रतिसाद त्यांच्या आगामी निवडणुकांतील प्रभावाची झलक दाखवतो. स्थानिक स्तरावर "काम करणारा नेता" अशी त्यांची प्रतिमा तयार झाली असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जाते.

शिवानी अनिरुद्ध यादव – खेडशिवापूर-खानापूर गटात आणि खेड शिवापूर गणात ही मजबूत पर्याय

या गणात गटात अलीकडेच लोकप्रिय ठरत असलेल्या नावांमध्ये शिवानी यादव यांचा समावेश पुढे आहे. महिलांशी सातत्याने संवाद, युवकांच्या प्रश्नांवर भूमिका, तसेच स्थानिक पायाभूत व्यवस्थेवरील मुद्दे मांडत त्यांनी स्वतःची ठसठशीत छाप निर्माण केली आहे.

यादव कुटुंबाची सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील सक्रियता, तसेच गावोगाव वाढणारा संपर्क यामुळे शिवानी यादव या या गटातील व गणातील प्रमुख स्पर्धक म्हणून चर्चेत आहेत.

स्थानिक महिलांमधील त्यांना मिळणारा प्रतिसाद आणि नवे नेतृत्व म्हणून दिसणारी लोकप्रियता ही त्यांची मोठी ताकद ठरत आहे.

या दोन्ही नेत्यांचे गटात व गणातील वजन वाढत असताना इतर काही नेते मात्र अजूनही अंतर्गत जुळवा-जुळवीमध्ये गुंतले असल्याचे चित्र दिसते.

अनेक नेत्यांची दमछाक होत असल्याचे स्थानिक राजकीय जाणकारांचे मत आहे. काही गावांत अद्यापही समन्वय न झाल्याने निर्णयप्रक्रियेला गती मिळालेली नाही.

#### नव्या समीकरणांची चाहूल

**या दोन्ही गणांत व गटात जावळकर व यादव नेत्यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे आगामी राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. युवा वर्गातील नव्या नेतृत्वाचा स्वीकार,महिलांतील वाढती राजकीय जाण,स्थानिक पातळीवरील प्रश्नांवरील तातडीची अपेक्षा या सर्व घटकांमुळे खानापूर व खेडशिवापूर-खानापूर गणातील गटातील निवडणूक लढत अधिकच रोचक होणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.**

## पानशेतची अनावश्यक संपादित जमीन मूळ मालकांना परत द्यावी

**विशाल भालेराव**

- अतिक्रमण कारवाईला स्थगितीची मागणी
- कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंता हणुमंत गुणाले यांना भगवानराव पासलकर यांनी दिले निवेदन

**पानशेत (दै. आरंभ पर्व)**

पानशेत व वरसगाव धरण प्रकल्पासाठी संपादित केलेली अनावश्यक जमीन मूळ मालक शेतकऱ्यांना परत द्यावी, तसेच पानशेत वसाहत परिसरातील अतिक्रमण कारवाई तात्काळ स्थगित करण्यात यावी, अशी संयुक्त मागणी स्थानिक नागरिकांनी जलसंपदा विभागाकडे केली आहे. या संदर्भात पुणे जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष भगवानराव पासलकर यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता हणुमंत गुणाले व मुख्य अभियंता हणुमंत धुमाळ यांना निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की— धरण प्रकल्पासाठी घेतलेल्या जमिनींपैकी अनेक जागा आता निर्लेप व विनाआवश्यक राहिल्या आहेत. ही उर्वरित जमीन मूळ शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.तसेच, पानशेत वसाहत परिसरातील अतिक्रमण कारवाई तात्काळ थांबवावी, कारण ही शासकीय वसाहत असून

पानशेत–वरसगाव धरणाचे कर्मचारी आणि प्रकल्पग्रस्त कुटुंबे गेल्या साठ वर्षांपासून येथे वास्तव्य करत आहेत. त्यांना अतिक्रमण म्हणून नोटिसा बजावणे अन्यायकारक असल्याचे पासलकर यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. स्थानिक रहिवासी संपादित जमिनीवर हॉटेल, किराणा दुकान, दूध डेअरी यासारखे व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. या रहिवाशांचे स्थलांतर संपादित जागेतच योग्य नियोजन करून करावे, अशी विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेही करण्यात आल्याचे पासलकर यांनी सांगितले. या निवेदनावेळी विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी, स्थानिक व्यावसायिक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पानशेत परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पुढाकार घ्यावा, अशी सर्वांची एकमुखी मागणी होती.

## भाजपची उमेदवारी शरद लाला जावळकरांकडे झुकली?

### कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता शिगेला!



**"खानापूर गण हा माझ्यासाठी केवळ मतदारसंघ नाही, तर कुटुंब आहे. या संपूर्ण गणाचा विकास, इथल्या प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान जपणे हीच माझी प्राथमिकता आहे. जनतेनं माझ्यावर दाखवलेला विश्वास मी केवळ कामातूनच परतफेड करणार आहे. एकसंघ गण... मजबूत नेतृत्व... आणि विकासाचा वेग — हेच माझं वचन."**

**— शरद लाला जावळकर, मा. सरपंच खानापूर**

**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

खानापूर गणातील आगामी निवडणुकांचे राजकारण तापू लागले असताना भाजपकडून उमेदवारी कोणाला मिळणार, याबाबतची चर्चा जोर पकडत आहे. या सर्व चर्चांच्या केंद्रस्थानी सध्या एकच नाव आहे — शरद लाला जावळकर.

शरद जावळकर यांचा राजकीय वारसा भक्कम मानला जातो. त्यांचे वडील मुरलीधर (नाना) जावळकर हे १९८१ पासून शिवसेना पक्षाशी जोडलेले होते. पुढे खडकवासला मतदारसंघाचे आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या विश्वासू सहकाऱ्यांपैकी ते १३ वर्ष राहिले. गावपातळीपासून तालुका पातळीपर्यंत त्यांचा प्रभाव कायम राहिलेला आहे. जावळकर

कुटुंबाने ग्रामविकासातही मोठी भूमिका बजावली आहे.

१९९७ ते २००२ : खानापूरचे उपसरपंच

२०११ ते २०१७ : सरपंच, खानापूर

याशिवाय काळभैरवनाथ पतसंस्था, देवस्थान, सहकार सोसायटी आणि माजी विद्यार्थी संघटना अशा अनेक संस्थांवर जावळकर कुटुंबाची सक्रिय भूमिका राहिली आहे.

या वारशाच्या बळावर पुढे आलेले शरद लाला जावळकर यांनी स्वतःची ओळखही मजबूत केली आहे. खानापूरचे माजी सरपंच ते भाजप खडकवासला मोर्चाचे अध्यक्ष असा त्यांचा राजकीय प्रवास सातत्यपूर्ण आणि प्रभावी राहिला आहे.

खानापूर गणात त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांची मोठी फौज असल्याने ते भाजपचे सर्वात मजबूत दावेदार मानले जात आहेत. स्थानिक कार्यकर्ते, जणकर आणि ग्रामस्थांमध्येही तसाच सूर ऐकायला मिळतो.

गणातील राजकीय वातावरणातून हेच स्पष्ट होते की — "खानापूर गणासाठी भाजपचे तिकीट शरद लाला जावळकर यांच्याकडेच झुकले आहे!"

येत्या दिवसांत भाजपकडून अधिकृत घोषणा होणार असली तरी गावकुसापासून सोशल मीडियापर्यंत जावळकरांच्या नावाभोवतीच चर्चा रंगत आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दिग्गज शेखर रवजियानी यांच्या सांगीतिक संवाद सत्राचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल हडपसर कॅम्पस मध्ये प्रसिद्ध भारतीय संगीतकार आणि मार्गदर्शक शेखर रवजियानी यांच्या सांगीतिक संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. ग्लोबल स्कूल्स ग्रुप लीडरशीप लेक्चर सीरीजच्या अंतर्गत या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सेशनच्या एलएलएस सीरीजमधे जीआयआयएस बालेवाडीच्या विद्यार्थ्यांनी ही सहभाग घेतला. या प्रोग्रॅमद्वारे सर्जनशीलता, उत्सुकता आणि महत्त्वाकांक्षेला चालना देत वर्गातले शिक्षण आणि प्रत्यक्ष आयुष्यातील अनुभवांचा मेळ घालण्याचे उद्दिष्ट आहे. एलएलएस सेशन्सचा एक भाग म्हणून शेखर यांनी आपला संगीतकार म्हणून आतापर्यंतचा प्रवास उलगडला. सर्जनशीलतेचा विकास करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त, कामातील अस्सलपणा यांविषयीही त्यांनी आपली मते मांडली. विद्यार्थी यावेळेस ताल, आवाजावरील नियंत्रण, स्टेजवरील सादरीकरण इत्यादींवर भर देणाऱ्या वर्कशॉपमधे सहभागी झाले होते. त्यानंतर प्रश्नोत्तरे व विद्यार्थ्यांचे सादरीकरण झाले.



### लोणावळा वुमेन्स फाउंडेशनतर्फे स्पोकन इंग्लिश कार्यशाळेचा समारोप

लोणावळा (आरंभ पर्व) : लोणावळा वुमेन्स फाउंडेशनतर्फे महिलांसाठी राबविण्यात आलेल्या ३-महिन्यांच्या स्पोकन इंग्लिश कार्यक्रमाच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचा आज यशस्वी समारोप करण्यात आला. या कार्यक्रमातून महिला सबलीकरण, कौशल्यविकास आणि वैयक्तिक प्रगतीला नवीन दिशा देण्याचा उद्देश साध्य झाला. "इंग्रजी शिकल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला असून आता रोजगाराच्या अनेक संधी आमच्यासमोर उपलब्ध होणार" अशा भावना यावेळी उपस्थित महिलांनी व्यक्त केल्या. हा कार्यक्रम प्रियदर्शनी संकुल, वायसी क्लासेस, लोणावळा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी लोणावळ्यातील प्रतिष्ठित अधिवक्ता मोनाली कुलकर्णी- शेलार आणि रोटरी क्लब ऑफ लोणावळाच्या अध्यक्षा विजया कल्याण या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीने आणि मार्गदर्शनाने कार्यक्रमात उत्साहाची नवी भर पडली.

### ताम्हिणी घाटात भीषण अपघात : पुण्यातील सहा तरुणांचा मृत्यू



खडकवासला (आरंभ पर्व) : कोकण पर्यटनासाठी निघालेल्या पुण्यातील सहा तरुणांचा ताम्हिणी घाटातील भीषण अपघातात मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना सोमवारी मध्यरात्री घडली. थार गाडीवरील नियंत्रण सुटल्याने वाहन सुमारे 500 फूट खोल दरीत कोसळल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेने पुणे व रायगड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.शहाजी चव्हाण (22), पुनित सुधारक शेट्टी (20), साहील साधू बोटे (24), महादेव कोळी (18), ओंकार सुनील कोळी (18), शिवा अरुण माने (19) हे सर्व तरुण पुण्यातील उत्तमनगर परिसरातील निवासी असून, सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास (11.30) एमएच 12 वायएन 8004 या थार कारने कोकण पर्यटनासाठी निघाले होते. मंगळवारी त्यांच्याशी संपर्क न झाल्याने पालकांनी उत्तमनगर पोलिसात हरवल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली. ड्रोनच्या मदतीने तपास करताना ताम्हिणी घाट परिसरात 500 फूट दरीत वाहनाचे अवशेष आढळून आले. त्यानंतर माणगाव पोलीस, SVRSS, शेलार मामा रेस्क्यू टीम आणि RESQ रेस्क्यू पथक यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर बचावकार्य हाती घेण्यात आले. रोप, स्ट्रेचर आणि क्रेनच्या मदतीने दरीत उतरून सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले. अपघात इतका भयानक होता की थार गाडीचा चक्काचूर झाला होता. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, सहा तरुणांचा अकाली मृत्यू संपूर्ण पुणे जिल्ह्यासाठी मोठा धक्का ठरला आहे.

### चौथ्या दिवशी चुरशीच्या स्पर्धा, अनेकांनी पटकावले सुवर्णपदक



बारामती (आरंभ पर्व) : पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपूर, बारामती येथे सुरू असलेल्या ५१ व्या कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा २०२५ चा चौथा दिवस आज अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यंदाचे आयोजन करण्याचा मान पुणे ग्रामीण पोलीस दलाला मिळाल्याने १७ ते २१ नोव्हेंबर दरम्यान विविध क्रीडा प्रकारांचे सामने बारामती परिसरातील विविध मैदानी ठिकाणी रंगत आहेत. आजचे सामने अधिकच उत्कंठावर्धक व चुरशीचे ठरले. अनेक खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य दाखवत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. सातारा, कोल्हापूर आणि सांगली संघांनी जलतरणमध्ये वर्चस्व राखत बहुतेक सुवर्णपदके पटकावली. जितेंद्र कुटे, सचिन खैरमोडे, समाधान बर्गे, खंडू माळी, रोहित खाडे, सुनील सुतार यांनी विविध स्पर्धांत सुवर्णपदके जिंकली. डायव्हिंगमध्ये सांगलीच्या सौरभ जासुद व रामचंद्र गायकवाड यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

# प्रभाग क्रमांक ३४ साठी भूपेंद्र मोरे यांचे "घड्याळ" ठरले!

## राष्ट्रवादीकडून मोरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब? सूत्रांची माहिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीची तयारी वेग घेत असताना सर्वच पक्षांत उमेदवार निवडीसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. धायरी–नऱ्हे–वडगाव परिसरातील महत्त्वपूर्ण प्रभाग क्रमांक ३४ मध्ये आता मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नऱ्हे येथील सामाजिक कार्यकर्ते श्री भूपेंद्र मुरलीधर मोरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पक्षाचे अधिकृत चिन्ह 'घड्याळ' त्यांच्याकडे देण्याचे संकेत अधिक बळकट झाले आहेत.



नऱ्हे–धायरी–वडगाव हा प्रभागातील सर्वात महत्त्वाचा आणि मतदारसंख्येने दाट भाग. या परिसरात भूपेंद्र मोरे हे लढाऊ, आक्रमक आणि चळवळीचे कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. प्रशासनाविरोधात त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने झाली असून, अलीकडील तिरडी आंदोलनाने त्यांचे नाव शहरभर चर्चेत आले. उपोषणे, रस्ते दुर्घटनांविरोधातील आक्रमक भूमिका आणि लोकांसाठी सातत्याने उभे राहणे यामुळे त्यांची प्रतिमा ठळकपणे समोर आली आहे.

मोरे यांना उमेदवारी जवळजवळ निश्चित झाल्याचे संकेत मिळताच प्रभाग ३४ मधील राजकीय समीकरणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मैदानात उतरण्याने इतर पक्षांच्या रणनीतीतही फेरबदल होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे मोठ्या उत्सुकतेने स्वागत केले असून, "लोकांमधून आलेल्या" आणि "लढाऊ स्वभावाच्या" कार्यकर्त्याला पक्षाने दिलेला पाठिंबा आगामी निवडणुकीचा प्रवाह बदलू शकतो, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

तथापि, मोरे नेमक्या कोणत्या जागेवरून निवडणूक लढवणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे विविध तर्क–वितर्कांना उधाण आले आहे.

दरम्यान, श्री. भूपेंद्र मोरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनीही उमेदवारीबाबत दुजोरा दिला.

"पक्षाने लढण्यासाठी व्यासपीठ दिले आहे. जनतेसाठी लढलेली लढाई यापुढेही थांबणार नाही. नेतृत्वाचे मी मनःपूर्वक आभार मानतो," अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

या घडामोडींमुळे प्रभाग क्रमांक ३४ मध्ये आगामी काळात मोठ्या राजकीय हालचाली पाहायला मिळणार, यात शंका नाही.

### कार्यकर्त्यांकडून जल्लोष!

**श्री भूपेंद्र मोरे यांच्या उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांनी त्यांच्या जनसंपर्क कार्यालया जवळ जल्लोष केला. पेढे भरवून हा आनंद साजरा करण्यात आला. भूपेंद्र भाऊंना नगरसेवक करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करणार असल्याचे यावेळी उपस्थित नागरिकांनी सांगितले.**

## दैनिक आरंभपर्वचा नवा उपक्रम

स्थानिक स्वराज्य संस्था PODCAST

### "नेता तुम्ही – माध्यम आम्ही"

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्थानिक प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी दैनिक आरंभपर्व तर्फे स्थानिक स्वराज्य संस्था PODCAST या नव्या आणि लोकाभिमुख उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. "नेता तुम्ही – माध्यम आम्ही" या आकर्षक संकल्पनेवर आधारित हा स्पेशल रिपोर्ट शहरातील लोकप्रतिनिधी, इच्छुक उमेदवार आणि नागरिकांना एकाच व्यासपीठावर आणणारा अनोखा उपक्रम ठरणार आहे.



या पॉडकास्ट मालिकेद्वारे प्रत्येक प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, नागरी सुविधा, प्रलंबित विकासकामे आणि स्थानिक समस्या यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर थेट, स्पष्ट आणि तथ्याधारित संवाद जनतेपर्यंत पोहोचवला जाणार आहे. निवडणुकांची चाहूल लागलेल्या पार्श्वभूमीवर मतदारांना वस्तुस्थिती समजण्यासाठी हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या स्पेशल रिपोर्टच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना त्यांच्या कार्याचा आढावा, पुढील विकास आराखडा, प्रभागनिहाय योजना व भविष्यातील व्हिजन जनतेसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच नागरिकांच्या अपेक्षा, तक्रारी आणि विकासाच्या गरजा समजून घेण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरेल.

"स्थानिक समस्यांवर तुमचा आवाज आता थेट जनतेपर्यंत पोहोचणार आहे. पारदर्शक संवाद ही काळाची गरज असून आमचा उद्देश जनतेला तथ्याधारित माहिती उपलब्ध करून देणे हा आहे," असे दैनिक आरंभपर्व चे व्यवस्थापकीय संपादक प्रतीक गंगणे यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी पुणे शहर पत्रकार महेश वरवटे हे प्रमुख समन्वयाची जबाबदारी सांभाळत असून निवासी संपादक लक्ष्मण साबळे, तसेच मार्केटिंग प्रमुख अभिषेक मरगळे यांचीही महत्त्वाची भूमिका आहे.

### सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटीने पुरातन ज्ञानाला दिली नवसंजीवनी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटी (एसव्हीयू) सातत्याने इंडियन नॉलेज सिस्टम्स म्हणजेच भारतीय ज्ञान प्रणालींवर विशेष भर देत भारतातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देत आहे. क. जे सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ धर्म स्टडीजअंतर्गत या विद्यापीठातर्फे योगशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र, प्राचीन भाषा आणि साहित्य आणि धर्मविषयक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. २१ व्या शतकातील बौद्धिक ज्ञानाची आस पूर्ण करतानाच भारताच्या प्राचीन ज्ञान पद्धतींची मुळे जपणारा सर्वसमावेशक अभ्यासक्रम यातून तयार झाला आहे. भारतीय ज्ञान प्रणालीतील संशोधन आणि शिक्षक प्रशिक्षण मंत्रालयाने प्रमाणित केलेले हे विद्यापीठ भारतातील काही निवडक केंद्रापैकी एक आहे जिथे संस्कृत, पाली, प्राकृत, हिंदू धर्म, जैन धर्म आणि बौद्ध धर्माच्या अभ्यासाला समकालीन संशोधन पद्धतींची जोड देण्यात आली आहे. तत्त्वज्ञान, पुरातत्त्वशास्त्र, भाषाशास्त्र, आरोग्य विज्ञान आणि सांस्कृतिक इतिहास अशा विविध क्षेत्रातील दृष्टिकोन यात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संकल्पनांचे मूळ अभ्यासता येते आणि त्याचवेळी भारतीय आणि जागतिक विचारप्रणाली घडवणाऱ्या पद्धती समजून घेता येतात. योगशास्त्र अभ्यासक्रमात ही पद्धती अधिक व्यापक स्वरुपात दिसून येते ज्यात योग तत्त्वज्ञानासोबतच मानसिक आणि शारीरिक आरोग्य, सर्वांगीण विकास या बरोबरीनेच आधुनिक मानसशास्त्र, शरीरविज्ञानशास्त्र इत्यादींची जोड दिली जाते.

# सिंहगड घाटात ११ हजार पॉईंट जीवघेणा!

## जड वाहतुकीमुळे अपघातांचा धोका वाढला

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड घाटातील जड वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून, अपघातांचे हॉटस्पॉट मानल्या जाणाऱ्या ११ हजार पॉईंटवर मंगळवारी सकाळी एक जड ट्रक धोकादायक स्थितीत अडकला. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली; मात्र घाटातील वाहतूक अनेक तास ठप्प राहिली.



गेल्या वर्षभरात सातारा महामार्गावरून खेड-शिवापूरमार्गे पुण्याकडे जाणारी जड वाहने मोठ्या प्रमाणात सिंहगड घाटाकडे वळू लागली आहेत. अरुंद, तीव्र वळणे आणि दरीकडे उघड्या बाजूंचा हा रस्ता अवजड वाहनांसाठी पूर्णपणे अयोग्य असल्याने अपघातांची मालिका वाढत आहे.

ट्रक अडकल्याने घाटात मोठी कोंडी झाली. पर्यटक, विद्यार्थी, स्थानिक रहिवासी यांची मोठी गैरसोय झाली. सायंकाळी उशिरा ट्रक मार्गावरून बाजूला करण्यात आला.

या ठिकाणी यापूर्वीही अनेक गंभीर अपघात झाले आहेत. अवजड वाहतूक करणारा ट्रक दरीत कोसळण्यापासून, विद्यार्थ्यांची बस दरीच्या उंबरठ्यावर अडकण्यापर्यंत अनेक हादरवणारे प्रसंग घडले आहेत. तरीही वन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वतीने संरक्षण भिंत, रेलिंग, लोखंडी बॅरिअर्स यांसारख्या सुरक्षाविषयक कामांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका होत आहे.

गोळेवाडी–सिंहगड पायथा हा सुमारे ९ किमीचा घाटमार्ग अरुंद आणि धोकादायक असल्याने जड वाहनांसाठी अत्यंत अपायकारक आहे. तातडीने सुरक्षा उपाययोजना न झाल्यास नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# इंदुरीकर महाराजांनी आता तरी सुधरावे

## श्री. प्रतिक गंगणे (विशेष लेख)

> समाजात आदराने पाहिले जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी
> **भाषेतील अतिरेक टाळावा**
> **संवेदनशील विषयांवर विचारपूर्वक बोलावे**
> **महिलांचा, तरुणांचा आणि सर्व घटकांचा सन्मान राखावा**
> **आणि आपल्या लोकप्रियतेचा उपयोग सकारात्मक बदलासाठी करावा**
> **हीच खरी "सुधारणा" आणि ही समाजाची अपेक्षा आहे.**

**(दै. आरंभ पर्व)**

इंदुरीकर महाराज हे समाजातील सर्वसामान्यांपर्यंत सहज, साध्या भाषेत कीर्तनाच्या माध्यमातून पोहोचणारे कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या विनोदातून, बोलण्यातून आणि टोमण्यांतून अनेकांना विचार करायला प्रवृत्त करत असले तरी काही वेळा त्यांच्या विधानांवरून निर्माण होणारे वाद, समाजात पसरत जाणारी गैरसमज, तसेच महिलांविषयी आक्षेपार्ह विधानांची वारंवार पुनरावृत्ती यामुळे त्यांच्यावर टीका होते.

या पार्श्वभूमीवर "इंदुरीकर महाराजांनी आता तरी सुधरावे" हा मुद्दा अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण लोकांच्या श्रद्धेचा, समाजातल्या प्रभावाचा आणि सार्वजनिक जबाबदारीचा प्रश्न यात गुंतलेला आहे.

**१. लोकप्रियतेसोबत जबाबदारीही वाढते**

इंदुरीकर महाराजांची ग्रामीण भागात मोठी लोकप्रियता आहे. मात्र मोठ्या प्रमाणावर लोक आपली वचने अक्षरशः मानतात, त्यावरून विचार तयार करतात. अशा वेळी त्यांच्या प्रत्येक विधानाचे पडसाद समाजात पडतात.

त्यामुळे धार्मिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक मंचावर उभे राहून केलेल्या प्रत्येक बोलण्याची जबाबदारीही तेवढीच महत्त्वाची ठरते.

**२. महिला, तरुणाई आणि शेतकरी या संवेदनशील विषयांवर अधिक सजगता आवश्यक**

महाराजांच्या काही जुन्या कीर्तनांमधील महिला, गर्भधारणा, कुटुंबव्यवस्था यावरील विधानांवर मोठ्या प्रमाणात टीका झाली. महिलांविषयी उपरोधिक किंवा अवमानकारक बोलल्याचे आरोपही झाले.


आजच्या समाजात महिला सक्षमीकरण, समान अधिकार, शिक्षण आणि स्वातंत्र्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

म्हणूनच अशा संवेदनशील विषयांवर बोलताना समाजात चुकीचा संदेश जाणार नाही याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

**३. कीर्तन ही परंपरा – संस्कारांची, सकारात्मकतेची**

कीर्तन ही परंपरा केवळ विनोदाची नसून संस्कारांची आहे. यातून आदर्श घडविण्याची क्षमता आहे.

इंदुरीकर महाराजांची शैली मनोरंजक असून त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात, परंतु मनोरंजनाच्या नादात जर समाजाला चुकीची दिशा मिळण्याची भीती असेल, तर ते दुरुस्त करणे हाच उत्तम मार्ग.



**४. नव्या पिढीसमोर आदर्श ठेवण्याची वेळ**

तरुण पिढी सोशल मीडियावरून, यूट्यूबवरून, लाईव कार्यक्रमांतून महाराजांचे विचार मोठ्या प्रमाणात पाहते.

आजची तरुणाई वैज्ञानिक दृष्टीकोन, समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय या मूल्यांवर चालते.

त्यामुळे या पिढीसमोर योग्य संदेश पोहोचणे गरजेचे आहे.

इंदुरीकर महाराजांना इतका मोठा व्यासपीठ मिळालेला असताना, योग्य आणि सभ्य भाषेचा वापर करून सकारात्मक मूल्य रुजवण्याची संधीही तितकीच मोठी आहे.

**५. 'चूक झाली, सुधारतो' – समाजाला अपेक्षित असलेला दृष्टिकोन**

कोणत्याही व्यक्तीकडून चुका होऊ शकतात, भाषेत अतिरेक होऊ शकतो. समाजही तेवढाच माफक आहे—पण सुधारण्याची तयारी हवी.

विवादानंतर अनेकदा संरक्षणात्मक भूमिका घेण्याऐवजी,

"हो, माझ्या शब्दांत कदाचित अतिरेक झाला. पुढे काळजी घेईन."

असा साधा, नम्र दृष्टिकोन समाजातील वाद शांत करण्यास मदत करू शकतो.

**६. समाजाचा आवाज ऐकणे महत्त्वाचे**

लोकांच्या भावना, स्त्रियांच्या संघटनांची मते, सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेली सूचनाही महत्त्वाची असते.

त्यांना शत्रू मानण्याऐवजी समाजाच्या अपेक्षा समजून घेऊन सुधारणा करणे हेच मोठेपण ठरेल.

इंदुरीकर महाराजांनी आता तरी सुधरावे – त्यांच्यासाठीच नव्हे, तर समाजासाठी इंदुरीकर महाराजांची कीर्तन परंपरा समाजापर्यंत पोहोचते, दिशादर्शक ठरते. त्यामुळे त्यांच्याकडून अधिक जबाबदारीची अपेक्षा असणे साहजिकच आहे.

आपल्याला हवे असल्यास या लेखाचे शीर्षक, उपशीर्षक, किंवा आणखी मोठ्या बातमीच्या स्वरूपात विस्तारित आवृत्तीही तयार करून देऊ शकतो.

### "कॉमेडी शो सुरू करा"

**इंदोरीकर महाराज यांनी कीर्तन सोडण्याचा इशारा दिल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या व 'भूमाता ब्रिगेड'च्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी त्यांच्यावर जोरदार टीका चढवली आहे. "कीर्तन करायचं की नाही हा तुमचा निर्णय; पण कीर्तन बंद करून कॉमेडी शोच सुरू करा," असा थेट सल्लाच त्यांनी इंदोरीकरांना दिला. तृप्ती देसाई म्हणाल्या की, – "इंदोरीकर महाराज, तुमच्या कीर्तनांत जेव्हा दुसऱ्यांच्या मुलींची, आई-वडिलांची बदनामी केली जाते, तेव्हा तुम्हाला काहीच वाटत नाही. मुलीच्या ड्रेसवर, वरात काढली की नाही अशा गोष्टींवर तुम्ही केलेल्या टिप्पणींमुळेच तुमच्यावर टीका झाली." पुढे त्या म्हणाल्या, – "तुम्ही मुलीचा साखरपुडा शाही थाटात केला, त्याबद्दल आम्हाला काही हरकत नाही. पण दुसऱ्यांच्या घरांबद्दल बोलताना तुम्हाला मजा येते; टाळ्या पिटवून घेतात. आणि जेव्हा तुमच्याच घरावर बोललं जातं, तेव्हा तुम्हाला त्रास होतो." "तुम्हाला फेटा ठेवायचा का कीर्तन बंद करायचं, हा तुमचा प्रश्न. पण प्रत्यक्षात तुमचं कीर्तन नसतंच – ती एक कॉमेडीच असते. त्यामुळे आता कीर्तन सोडा आणि कॉमेडी शो सुरू करा." इंदोरीकरांच्या निर्णयानंतर तृप्ती देसाईंच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा वादंग पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.**



## थोडक्यात पण महत्वाचे



### ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर फॅशनला घेऊन गेला फ्युचरव्हर्समध्ये

मुंबई (आरंभ पर्व) : ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने त्यांच्या गुरुग्राम आवृत्तीत 'द फ्युचरव्हर्स ऑफ फॅशन'ची सुरुवात केली, ज्यामध्ये तंत्रज्ञान, डिझाइन आणि आकर्षक कथाकथन फॅशनच्या अनुभवाची पुनर्कल्पना कशी करत आहे याचा एक अभूतपूर्व शोध घेण्यात आला. फॅशनच्या पुढील वाटचालीची व्याख्या करण्याच्या या वर्षीच्या ध्येयापासून पुढे जात, या आवृत्तीने एक अविश्वसनीयपणे आकर्षक असे दृश्य सादर केले ज्यामुळे फॅब्रिक आणि त्याचे स्वरूप याच्या पलीकडे, AI, कोड आणि परस्परसंवादाच्या डिजिटल युगाची झलक दिसली. फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) सोबत फॅशन टूरच्या दीर्घकालीन सहकार्यासोबतच डिझायनर फाल्गुनी आणि शेन पीकॉक यांच्या क्रिएटीव्ह शक्तींनी या प्रदर्शनाचे नेतृत्व केले. आजकालच्या फॅशन क्षेत्रातील प्रेक्षकांना केवळ फॅशनमधील डिझाइन्स बघायचे नाही, तर त्यांना त्याचा अनुभव सुद्धा घ्यायचा आहे ते जिवंत ठेवायचे आहे आणि हीच वास्तविकता या आवृत्तीच्या केंद्रस्थानी आहे.'फॉच्युअरव्हर्स ऑफ फॅशन' ने या इच्छेला म्हणजेच वास्तविकतेला एका आकर्षक विश्वात नेले, जिथे महत्त्वाचा मार्ग म्हणजे फॅशनचा जिवंत कॅनव्हास बनली. आऊटफिट केवळ भविष्यवादी सिल्हूटमध्ये नव्हते तर भविष्यातील विचारांमध्ये देखील होते, ज्यामुळे फॅशनची प्रगती होत आहे याची जागतिक संवेदनशीलता लक्षात येते. ह्युमनॉइड रोबोट्ससह शो ला उत्साही करणारी तमन्ना भाटिया, संपूर्ण शो कथेला जोडणारे डायनॅमिक प्रोजेक्शन, क्षेत्रातील प्रत्येक मॉडेलच्या हालचाली दर्शविणारे मोशन-सेन्सिंग व्हिज्युअल, व्हर्च्युअल आणि वास्तवामध्ये कार्याचा ठसा उमटवणाऱ्या शाहिद कपूरच्या होलोग्राफिक शोस्टॉपिंग क्षणापर्यंत शोकेसच्या प्रत्येक घटकाने प्रेक्षकांना फॅशनच्या पुढील आयामात नेले.




### रुबी हॉल क्लिनिकचा इमोहा एल्डरकेअर सोबत करार

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील सर्वात विश्वासार्ह आरोग्यसेवा संस्थांपैकी एक असलेल्या रुबी हॉल क्लिनिकने इमोहा एल्डरकेअर सोबत एका ऐतिहासिक सहयोगाची घोषणा केली. ही धोरणात्मक भागीदारी शहरासाठी एक संरचित, करुणामयी आणि वैद्यकीयदृष्ट्या देखरेखीखाली ज्येष्ठांसाठी देखभाल परिसंस्था तयार करण्याचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या स्वास्थ्य पुनर्प्राप्तीच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर पाठिंबा देण्यासाठी रचना केलेला हा उपक्रम रूग्णालयातून घराकडचा प्रवास अधिक सुलभ करत  अखंड वैद्यकीय देखरेख, वैयक्तिक निगा आणि भावनिक संबंध प्रस्थापित करणारा ठरेल. या कार्यक्रमाला डॉ. विराज राव कोरे आणि डॉ. प्राची साठे यांच्यासह प्रख्यात आरोग्य चिकित्सक उपस्थित होते, तसेच रुबी हॉल क्लिनिकचे फिजिशियन आणि विश्वस्त डॉ. सायमन ग्रँट, रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेहराम खोदाईजी  आदी मान्यवर उपास्थित होते. त्यांनी पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा उपक्रमांच्या महत्त्वावर भर दिला.

### राजगुरुनगर नगरपरिषदेसाठी १७५ अर्ज वैध; चार उमेदवारांचे अर्ज बाद

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील राजगुरुनगर नगरपरिषदेच्या २१ नगरसेवकपदांसाठी अखेरच्या दिवशी सोमवार (दि. १७) पर्यंत १६८, तर नगराध्यक्षपदासाठी ११ अर्ज असे एकूण १७९ अर्ज दाखल झाले होते. या अर्जाची मंगळवारी (दि. १८) छाननी झाली. त्यात नगरसेवकपदाच्या ४ उमेदवारांचे अर्ज बाद ठरले आहेत. त्यामुळे या निवडणुकीसाठी एकूण १७५ अर्ज वैध ठरले असल्याची माहीती निवडणूक निर्णय अधिकारी शैलजा पाटील यांनी दिली. मंगळवारी सर्व अर्जांची छाननी झाली. त्यात पक्षाचा अर्ज दाखल केला, मात्र एबी फॉर्म जोडला नसल्याने प्रभाग क्रमांक २, ८ आणि ९ मधील प्रत्येकी एक, तसेच दोन अर्जावर एकच व्यक्ती सूचक झाल्याने प्रभाग क्रमांक ८ मधील एक असे चार उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. छाननीनंतर एक किंवा अधिक अर्ज दाखल झालेल्या मधून नगरसेवकपदासाठी ९९ जणांचे १६४ अर्ज शिल्लक राहिले आहेत. तर नगराध्यक्षपदासाठी ६ जणांचे ११ अर्ज वैध ठरले आहेत. नगराध्यक्षपदासाठी वैध ठरलेल्या अर्जात शिवसेना (उबाठा) पक्षाचे बापू थिगळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण आहेर, शिवसेना (शिंदे गट) मंगेश गुंडाळ, भाजपाचे शिवाजी मांदळे, ॲड. दीपक थिगळे (अपक्ष) व गणेशकुमार इंगवले (अपक्ष) यांचे अर्ज वैध ठरले आहेत. आता शुक्रवारी (दि. २१) माघारीची अंतिम मुदत आहे. त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होईल. याशिवाय अर्ज छाननी अथवा इतर अपील असल्यास मंगळवार (दि.२५) पर्यंत निर्णय होईल. त्यानंतरच अर्ज वैधतेची संख्या निश्चित होणार असल्याचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी सांगितले.

### पुण्यात ३५ लाख ५१ हजार मतदार,प्रारूप मतदारयादी जाहीर

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी गुरुवारी (ता. २०) जाहीर झाली असून, एकूण ३५ लाख ५१ हजार ४६९ इतके मतदार मतदान करू शकणार आहेत. यामध्ये प्रभाग क्रमांक नऊ सूस-बाणेर-पाषाण हा सर्वाधिक एक लाख ६० हजार २४२ मतदारांचा आहे. सर्वांत कमी ६२ हजार २०५ मतदार हे प्रभाग क्रमांक ३९ अप्पर सुपर इंदिरानगर येथे आहेत. एकूण ४१ प्रभागांपैकी १० प्रभागांमधील मतदारसंख्या ही एक लाखाच्या पुढे आहे. त्यामुळे येथील उमेदवारांची चांगलीच दमछाक होणार आहे. पुणे महापालिकेची प्रभाग रचना अंतिम झाली असून, त्यातील आरक्षित प्रभागही निश्चित झालेले आहेत. त्यानंतर प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे.

# खानापूर गणात बापूंचा वारसा पुन्हा उजळला

## सभापती कै. किसन बापू जोरी यांच्या पावलावर धनराज जोरींची ठाम वाटचाल, जनतेचा प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद!

**विशाल भालेराव**




> "बापूंनी आमच्या गावाचं आयुष्य बदलून टाकलं. विकासाचं जे बी त्यांनी पेरलं, ते धनराज आता झाड बनवतोय. तो आमचा नेता नाही, आपला माणूस आहे." - गणेश जावळकर (खानापूर)

> "बापूंनी महिलांना भावासारखं स्थान दिलं, त्याच परंपरेनं धनराज महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करत आहेत. त्यांचं नेतृत्व संवेदनशील आणि लोकाभिमुख आहे." - सौरभ कांबळे (डोणजे)

> "बापूंनी तरुणांना नोकऱ्या दिल्या, शिक्षणासाठी मार्गदर्शन केलं. आज धनराज तरुणांच्या हक्कासाठी, रोजगारासाठी लढतोय. युवावर्ग त्याच्यासोबत उभा आहे." -साधना यादव (खानापूर)

> "राष्ट्रपतींकडून बापूंचा सन्मान झाल्याने आम्हाला अभिमान वाटतो. धनराज त्या परंपरेला न्याय देत आहेत. खानापूर गण पुन्हा बापूंच्या काळासारखा सुवर्णकाळ पाहणार आहे." - निलेश शिंदे (खेडशिवापूर)

**खानापूर (दै. आरंभ पर्व)**

"नेतृत्व म्हणजे पद नव्हे, तर लोकांच्या मनावर राज्य करणं." हे विधान सभापती कै. किसन बापू जोरी यांच्यावर अक्षरशः लागू होतं.

गोरगरीब जनतेसाठी नि:स्वार्थ भावनेने काम करताना त्यांनी आयुष्यभर लोकसेवेचा आदर्श ठेवला.

शेतकरी, तरुण, महिला, आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल स्वतः भारताच्या राष्ट्रपतींकडून सन्मानपत्र देऊन घेण्यात आली होती, ही खानापूर गणासाठी अभिमानाची बाब ठरली होती.

आज त्या बापूंच्या कार्याचा वारसा जोपासत त्यांचा सुपुत्र धनराज जोरी जनतेत उतरला असून, खानापूर गणात नवचैतन्याचं वातावरण निर्माण झालं आहे.

बापूंच्या प्रामाणिकतेचा आणि सेवाभावाचा ठसा धनराज जोरी आपल्या वर्तणुकीत आणि नेतृत्वशैलीत स्पष्टपणे उमटवत आहेत.

जनतेच्या मनात आज पुन्हा एकदा तोच आवाज दुमदुमतोय —

"बापूंचा वारसा जिवंत आहे, धनराजचं नेतृत्व परिवर्तनाचं प्रतीक आहे!" खानापूर गणात नव्या राजकीय समीकरणांच्या आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, धनराज जोरींचं नेतृत्व बापूंच्या विचारांचा जाज्वल्य दीप म्हणून समोर येत आहे.

जनतेचा विश्वास, बापूंचं आशीर्वाद आणि कार्याचा वारसा — या त्रिसूत्रीवर उभा राहून धनराज जोरी आता खानापूर गणात नव्या इतिहासाची पायाभरणी करत आहेत. "बापूंची परंपरा – धनराजचं नेतृत्व; खानापूर गण नव्या उर्जेनं पुढे चाललाय!"

### पुणे विद्यापीठात आण्विक आणि पदार्थ विज्ञान परिषदेला सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात आण्विक आणि पदार्थ विज्ञानावरील राष्ट्रीय परिषदेला गुरुवारी सुरवात झाली. ज्येष्ठ विज्ञान लेखक आणि विभागप्रमुख डॉ. संजय ढोले यांच्या सन्मानार्थ ही विशेष परिषद आयोजित केली आहे. परिषदेचे उद्घाटन भाभा अणुविज्ञान केंद्राचे (बीएआरसी) ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. कैलाश, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रा. व्ही. एन. भोरासकर, परिषदेचे मुख्य समन्वयक डॉ. शैलेंद्र दहिवले यांच्या उपस्थितीत झाले. परिषदेत देशातील संशोधक आणि शास्त्रज्ञ सहभागी झाले आहेत. ही परिषद शनिवारपर्यंत (ता. २२) चालणार आहे. पदार्थ विज्ञान आणि आण्विक तंत्रज्ञानातील अलीकडच्या काळात झालेली नवी संशोधने परिषदेत सादर केली जाणार आहेत. 'बीएआरसी'च्या डॉ. आराधना श्रीवास्तव, कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाचे डॉ. भरत कुमार, अलिगड मुस्लिम विद्यापीठाचे डॉ. बी. पी. सिंह, इम्पिरिअल कॉलेजचे (लंडन) डॉ. बिधन पंडित, भारतीय अवकाश संशोधन केंद्राचे (इस्रो) डॉ. गिरीश गौडा, पंजाब केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. संतोष कुमार महापात्रा, जपानचे शास्त्रज्ञ डॉ. माकोतो शिन्दे, निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. श्रीनिवास जी, डॉ. अविनाश कुलकर्णी यांची व्याख्याने होणार आहेत.

परिषदेच्या काळात संशोधक विद्यार्थ्यांचे शोधनिबंधही सादर होणार आहेत. आरोग्य, संरक्षण, नवसंशोधन, कृषी, ऊर्जा आणि अवकाश क्षेत्रात पदार्थ आणि अणु विज्ञानातील संशोधनाची सद्यःस्थिती आणि भविष्यकालीन संधींवर परिषदेत चर्चा होणार आहे. डॉ. ढोले येत्या ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होत असून, त्यांच्या सन्मानार्थ पुण्यासह देशभरातील संशोधकांनी ही विशेष परिषद भरवली.

# ट्विन्स, चढाओढ आणि वाढत्या वयातले वाद

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

शालेय जीवनातील गोंधळ, क्रश आणि संभ्रम पुन्हा अनुभवण्यासाठी आता सज्ज व्हा. ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रिमिंग सेवा-ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने को-एड या आपल्या न्यू कमिंग-ऑफ-एज ड्रामाचे ट्रेलर नुकतेच अनावरीत केले, नंतर बालदिनाला टीजर रिलिज करण्यात आले. फक्त मुले व फक्त मुलींच्या शाळेच्या पार्श्वभूमीवरुन सुरुवात होऊन, पुढे अनेक वर्षांनी त्या वातावरणात गुंगायला होते, नंतर किशोरवयीन जगासोबत सामना झाल्यावर चुकांची मिश्किल कॉमेडी, वादविवाद, उत्सुकता आणि पहिल्या-वहिल्या प्रेमाची अनुभूती मिळते. गुटर गू सारख्या अतिशय लोकप्रिय सिरीजमागची जोडी, सिख्या एंटरटेन्मेंट आणि निर्देशक साकिब पांडोर आणखी एक वास्तववादी कथा घेऊन आले आहेत ज्यात विनोद, भावनिकता आणि आठवणींचा समावेश होतो. वेदांत सिन्हा, अद्रिजा सिन्हा, वरुण




बडोला आणि राजेश्वरी सचदेव यांच्या प्रमुख भूमिका असलेला, सीओ-इडी आपल्या कौटुंबिक कथानकामार्फत तुम्हाला एका हृदयस्पर्शीरोलर कोस्टर सफरीवर घेऊन जाणार आहे. ट्रेलरमध्ये दोन विरुध्द वृत्ती अचाकन समोरासमोर आल्यावर मजेशीरपणे घडणारे प्रसंग दिसतात. शिखा आण निखील पारवानी याहून वेगळे असूच शकत नाहीत. शिखा बेधडक, स्पष्ट बोलणारी आणि बॅक बेंचर आहे, तर याउलट निखील भित्रा, लाजाळू आणि क्लास टॉपर आहे. अनपेक्षितपणे मुलांची आणि मुलींची शाळा एकत्र करण्यात आल्यावर ते गोंधळतात. हास्य, संभ्रम आणि भावनीक क्षणांसोबत व्यक्तीमत्वांमध्ये खटके उडतात आणि मजेशीर चढाओढी होतात. विनोद, नॉस्टाल्जिया आणि भावनांचा सुंदर मिलाफ असलेला को-एड वाढत्या वयातल्या गुंत्याला, जादू आणि वेडेपणाला चपखलपणे आपल्या समोर आणतो. सिरीजबद्दल बोलताना ॲमेझॉन एमएस प्लेअरचे डायरेक्टर आणि हेड ऑफ कंटेंट, अमोघ दुसाद म्हणाले, "दैनंदिन जीवनातल्या बारकाव्यांना दाखवत सर्व वयोगटांमधल्या प्रेक्षकांची नेहमी करमणूक करणे हा ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचा उद्देश आहे. को-एड वाढत्या वयातल्या मुलांची उत्सुकता, संभ्रम आणि धैर्य दाखवणारे हृदयस्पर्शी कथानक आहे-हा जीवनातला असा टप्पा असतो, जिथे खेळकरपणा आणि महत्वाच्या शिकवणी एकत्रितपणे अगदी सहज अनुभवता येतात. सिख्या एंटरटेन्मेंटसोबतच्या आमच्या सहयोगाला पुढे नेण्यासाठी आम्ही अतिशय उत्सुक आहोत, ज्यायोगे भारतीय प्रेक्षक वर्गाला आणखीन एक आपलीशी वाटणारी, नॉस्टॅल्जिक गोष्ट पाहता येईल." गुनीत मोंगा कपूर, सिख्या एंटरटेन्मेंट, म्हणाल्या, "गुटर गू सिरीजच्या 3 सिजन्सनंतर नवीन आणि तरुणाईसोबत साधर्म्य साधणारी गोष्ट सादर करण्यासाठी को-एडमध्ये, गिरीश जोतवानी आणि दिग्दर्शक साकिब एकत्र आले आहेत. निर्भिड आणि उत्साही अद्रिजा सिन्हा आणि वेदांत सिन्हा यांनी पारवानी ट्विन्स म्हणूनसर्व विपरीत घडू लागल्यावर एकत्र जगणे म्हणजे काय असते हे ख-या अर्थाने समजून घेतले आहे! साकिब आणि गिरीश यांच्या जोडीने भावंडांचे प्रेम, सहका-यांचा दबाव, मित्रत्व आणि नवीन आयामांचा सामना करणारे मजेदार कुटुंब असणारे सुंदर जग निर्माण करण्यासाठी अपार श्रम घेतले आहेत. वरुण बडोला आणि राजेश्वरी सचदेव यांच्या सारख्या दिग्गज अभिनेत्यांनी अतिशय मायेने आणि खरेपणाने पालकांच्या भूमिकेला न्याय दिला आहे.

### पोषण न गमावता व्हेगन बनण्यासाठीची स्मार्ट मार्गदर्शिका– ऋतिका समद्दार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

व्हेगन जीवनशैलीकडे वळणे हे उत्तम आरोग्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि करुणेकडे जाणारे प्रभावी पाऊल मानले जाते. जरी अनेकांची धारणा असते की व्हेगन आहारात महत्त्वपूर्ण पोषकतत्त्वांची उणीव भासू शकते, तरीही सुयोग्य नियोजनामुळे हा आहार पूर्णपणे संतुलित आणि पोषक बनू शकतो. व्हेगन आहाराचा अर्थ फक्त प्राणिजन्य पदार्थांचा त्याग नसून, विविध वनस्पती-आधारित पदार्थांनी सजलेली समृद्ध थाळी तयार करणे हा आहे. यासंदर्भात, दिल्लीतील मॅक्स हेल्थकेअरच्या रीजनल हेड ऑफ डायटेटिक्स, ऋतिका समद्दार यांनी व्हेगन आहार स्वीकारू इच्छिणाऱ्यांसाठी काही उपयुक्त टिप्स आणि मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

दिल्लीतील मॅक्स हेल्थकेअरच्या रीजिअनल हेड ऑफ डायटेटिक्स, ऋतिका समद्दार यांच्या मते, आरोग्यदायी व्हेगन आहाराची पायाभरणी ही संपूर्ण, कमीतकमी प्रक्रिया केलेल्या पदार्थांवर आधारित असावी. त्या सुचवतात की आपल्या ताटातील अर्धा भाग रंगीबेरंगी फळे आणि विविध भाज्यांनी भरावा, ¼



भाग कडधान्यांसारख्या आरोग्यदायी प्रथिनांनी आणि उर्वरित ¼ भाग ब्राउन राईस, गहू, बाजरी यांसारख्या संपूर्ण धान्यांनी भरावा. यासोबतच बदामांसारखे आरोग्यदायी फॅट्स—विशेषतः कॅलिफोर्निया बदाम—जोडल्यास आहार अधिक संतुलित बनतो. हे बदाम प्रथिन, आहारातील तंतू आणि व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, फायबर आणि पोटॅशियमसह 15 आवश्यक पोषकतत्त्वांनी समृद्ध असतात. दिवसाची सुरुवात एका मूठ कॅलिफोर्निया बदामांसह केल्यास दिवसाचा आरोग्यदायी सूर लागतो.

**संपूर्ण अन्नपदार्थ आणि रंगीबेरंगी वनस्पती-आधारित घटकांची ताकद**

प्रथिनांची दैनंदिन गरज पूर्ण करण्यासाठी दिवसभरात डाळी, कडधान्ये, सुकामेवा आणि बिया अशा विविध वनस्पती-आधारित स्रोतांचे संयोजन केल्यास स्नायूंच्या पुनर्बांधणीसाठी व कार्यक्षमतेसाठी आवश्यक सर्व अमिनो आम्ले मिळतात. संतुलित व्हेगन आहारात पालकासारख्या पालेभाज्या (कॅल्शियम व लोहासाठी), तसेच लाल व केशरी भाज्या (अँटिऑक्सिडंट्ससाठी) असणे महत्त्वाचे आहे. ऊर्जा देणारी संपूर्ण धान्ये आणि पोषक तत्त्वांची पूर्तता करणारे बदाम यांचा समावेश आहार अधिक सर्वसमावेशक बनवतो.

**बदाम—उत्तम प्रोटीन बूस्टर**

प्रति १०० ग्रॅममध्ये १८.४ ग्रॅम प्रोटीन देणारे बदाम दैनंदिन प्रोटीनच्या सुमारे ३०% गरजा पूर्ण करतात. याशिवाय, त्यातील आहारातील तंतू रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि दीर्घकाळ पोटभरणाची भावना टिकवून ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे वजन व्यवस्थापनासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरतात. भारतीय मसाल्यांसह फ्लेव्हर केलेले, सॅलडमध्ये मिसळलेले, डेझर्टवर टॉपिंग म्हणून वापरलेले किंवा तसेच खाल्लेले—बदामांचा उपयोग विविध प्रकारे करता येतो. दररोजची एक मूठभर मात्रा प्रोटीनची गरज पूर्ण करण्याचा सोपा आणि स्वादिष्ट मार्ग प्रदान करते.

**ओमेगा-३ आणि कॅल्शियम**

रितिका आरोग्यदायी चरबीयुक्त पदार्थांच्या सेवनावरही भर देतात. अवोकॅडो, बिया आणि ऑलिव्ह तेल यांसारख्या स्रोतांमधून मिळणारी आरोग्यदायी फॅट्स शरीराला हृदय व मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले ओमेगा-३ प्रदान करतात. याशिवाय, कॅल्शियम समृद्ध वनस्पती-आधारित फोर्टिफाईड दूध—जसे की बदाम दूध, सोया दूध—तसेच टोफू आणि ब्रोकोली यांचा आहारात समावेश केल्याने मजबूत हाडे आणि दात राखण्यासाठी आवश्यक कॅल्शियमची गरज पूर्ण होऊ शकते.

समद्दार यांचा आग्रह आहे की व्हीगन पद्धतीत कडक कच्चा आहार किंवा तेलरहित आहार यांसारख्या टोकाच्या पद्धतींपेक्षा टिकाऊ तसेच आनंददायी आहारशैलीला प्राधान्य दिले पाहिजे. त्या व्हिटॅमिन बी12, व्हिटॅमिन डी, लोह आणि कॅल्शियम या महत्त्वपूर्ण पोषकद्रव्यांच्या पूर्ततेकडे लक्ष देण्याचे महत्त्व अधोरेखित करतात.

### वेद भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे

*श्री गोविंददेव गिरीजी महाराज*



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय संस्कृति ही वेदमूलक आहे. यामध्ये जे ज्ञान आहे त्या ज्ञानाच्या उपासनेतूनच एक दिवस भारत माता विश्वगुरू होईल. खरंतर वेद हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे आणि विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय महामंत्री राहिलेले अशोक सिंघल हे ख-या अर्थाने वेदोपासक होते, असे गौरवोद्गार अयोध्या श्री राम मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी काढले. विश्व हिन्दू परिषदेचे संस्थापक सदस्य तथा श्री रामजन्म भूमि आंदोलनाचे अग्रणी अशोक सिंघल यांच्या पुण्यतिथी निमित्ताने भारतात्मा अशोक सिंघल वेद पुरस्कार दर वर्षी प्रदान केले जातात. याच शृंखलेत २०२५ चे पुरस्कार सोमवार १७ नोव्हेंबर २०२५ रोजी बीएमसीसी रोडवरील दादासाहेब दरोडे सभागृहात वितरित करण्यात आले. उत्कृष्ट वेद विद्यार्थी श्रेणीतील पुरस्कार हैदराबाद येथील श्री नोरी केदारेश्वर शर्मा, चेन्नईचे श्री अनंत कृष्ण भट्ट यांना आदर्श वैदिक शिक्षक पुरस्कार आणि सर्वोत्कृष्ट वैदिक संस्था पुरस्कार आंध्र प्रदेशातील राजमहेंद्रवरम येथील श्री दत्तात्रेय वेद विद्यालयाला यांना तीन लाख, पाच लाख आणि सात लाख रुपये, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वामी गोविंददेव गिरी महाराज आणि आचार्य श्री प्रद्युम्न महाराज यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यावेळी व्यासपीठावर सिंघल फाऊंडेशन मार्गदर्शक रवींद्र मुळे, सिंघल फाऊंडेशन चे मुख्य विश्वस्त संजय सिंघल आणि सलिल सिंघल उपस्थित होते.

# भाजपाचे मंडलाध्यक्ष यशवंतबापू लायगुडे यांची जनतेत क्रेझ

## मंडलाध्यक्ष झाल्यापासून कार्यशैलीत मोठी वाढ, पक्ष दखल घेऊन मोठी ताकद देण्याची शक्यता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीची तयारी सुरू असताना धायरी नऱ्हे–वडगाव परिसरातील युवा नेतृत्व म्हणून यशवंत लायगुडे (बापू) यांचे नाव विशेषत्वाने चर्चेत आहे. भारतीय जनता पक्षाने त्यांची धायरी–वडगाव मंडलाध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्यानंतर त्यांच्या जनसंपर्कात, संघटनात्मक हालचालीत आणि लोकाभिमुख कामात उल्लेखनीय वाढ झाली आहे. मंडलाध्यक्ष झाल्यापासून त्यांचे नेतृत्व अधिक प्रभावीपणे पुढे येत आहे.



अतिशय शांत, नम्र आणि सर्वांसोबत सहज संवाद साधणारे यशवंत बापू यांनी पद मिळाल्यानंतर परिसरातील विविध मूलभूत प्रश्नांवर सक्रियपणे काम करण्यास सुरुवात केली. नागरिकांच्या समस्या—पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक—यांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी सातत्याने प्रशासनाशी पाठपुरावा केला. यामुळे त्यांच्या कामाचा आणि नेतृत्वाचा आवाज गल्लीबोळापर्यंत पोहोचू लागला आहे. मंडलाध्यक्ष झाल्यानंतर भाजपाच्या सर्व उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग अधिक वाढला. कार्यकर्त्यांशी सातत्याने भेटी, चर्चा, नियोजन आणि प्रत्येक कार्यक्रमात घेतलेली पुढाकार ठेवणारी भूमिका पाहून पक्षातील ज्येष्ठही प्रभावित झाले आहेत. आमदार भीमराव तापकीर, तसेच पक्षातील इतर सर्व वरिष्ठांशी त्यांचे अत्यंत स्नेहपूर्ण संबंध असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ते परिसरातील संघटन अधिक मजबूत करत आहेत.

याशिवाय नुकत्याच झालेल्या खासदार क्रीडा महोत्सवात त्यांनी केलेले उत्स्फूर्त योगदान मोठ्या प्रमाणात कौतुकास्पद ठरले. युवा कार्यकर्त्यांना एकत्रित करणे, कार्यक्रमाचे नियोजन आणि समन्वय यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. भाजपाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा त्यांनी हाती घेतलेला ध्यास पाहून कार्यकर्ते आणि नागरिक एकमुखाने "पक्ष निश्चितच यशवंत बापूंच्या प्रामाणिक कामाची योग्य दखल घेईल" असा विश्वास व्यक्त करत आहेत.

महानगरपालिका निवडणुकीत त्यांच्याबद्दल चर्चेला वेग आला असला, तरी स्वतः यशवंत बापूंनी "या वेळेस आमचे चुलते, माननीय राजाभाऊ लायगुडे आप्पा उतरणार आहेत, परंतु पक्षाने जर संधी दिली तर निश्चितपणे त्या संधीचा सोने करेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे" असे सांगून नम्रता आणि पक्षनिष्ठा दोन्ही जपली.

तरीदेखील, मंडलाध्यक्ष झाल्यापासून त्यांच्या लोकप्रियतेला प्रचंड उसळी मिळाली आहे. परिसरातील तरुणाई आणि नागरिकांमध्ये "आपला बापू नगरसेवक व्हावा" अशी मागणी वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

एकूणच, धायरी–वडगाव परिसरात यशवंत बापू लायगुडे हे उदयास येत असलेल्या सक्षम, शांत, संयमी आणि सर्वसमावेशक युवा नेतृत्वाचे मजबूत प्रतीक ठरत आहेत.